सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १९ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सीमेवरील तणावाच्या काळात चीनने पाकिस्तानसाठी हेरगिरी केली

### 'सेंटर फॉर जॉइंट वॉरफेअर स्टडीज' या थिंक टँकच्या या अहवालात खुलासे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९जम्मू**



पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. यानंतर भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव वाढला होता.या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय लष्कराने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तानमधील नऊ दहशतवादी तळांवर हल्ले केले. ऑपरेशन सिंदूर मध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

दोन्ही देशांमध्ये हल्ले सुरू होते त्यावेळी चीनने पाकिस्तानसाठी भारताची हेरगिरी केली होती. सॅटेलाईटवरील डेटाही शेअर केला होता. संरक्षण मंत्रालयाशी संलग्न असलेल्या 'सेंटर फॉर जॉइंट वॉरफेअर स्टडीज' या थिंक टँकच्या या अहवालात दोन मोठे खुलासे झाले आहेत. आता चीनच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.चीनने पाकिस्तानसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले, पण ते भारतीय सैन्यासमोर टीकू शकले नाहीत. लष्कराने फक्त दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले नाहीत तर अचूक हल्ल्यांमध्ये अनेक मोठ्या दहशतवाद्यांना ठार मारले.

मिळालेल्या माहितीनुसार, भारताच्या लष्करी तैनातीवर लक्ष ठेवण्यासाठी चीनने पाकिस्तानला त्यांचे हवाई संरक्षण आणि रडार प्रणालीद्वारे मदत केली. याशिवाय, २२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर आणि त्यानंतर सुरू झालेल्या संघर्षाच्या १५ दिवसांत चीनने उपग्रहावरुन भारतावर लक्ष ठेवले.

भारताने कोणतीही हवाई कारवाई केली की तर त्याची आधीच माहिती पाकिस्तानला मिळत होती, अशी यंत्रणा चीनने रडारची केली होती, असे थिंक टँक सीजेडब्ल्यूएसचे महासंचालक मेजर जनरल अशोक कुमार म्हणाले.पाकिस्तानने फक्त चीनकडून मिळालेल्या शस्त्रांचा वापर केल्याचा दावा केला. पाकिस्तानचे दावे उघड केले आहेत. चीनने पाकिस्तानला धोरणात्मक, गुप्तचर आणि तांत्रिक मदत दिल्याचेही सांगण्यात आले.

## मी उपलब्ध नाही...पाकिस्तानची पोलखोल करण्यासाठी जाणाऱ्या शिष्टमंडळाबरोबर जायला युसूफ पठाण यांचा नकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

पाकिस्तानातील दहशतवादाविरोधातील 'ऑपरेशन सिंदूर'नंतर देशाची बाजू आंतरराष्ट्रीय स्तरावर मांडण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये सात खासदारांचा समावेश असून हे खासदार अनेक प्रमुख देशांच्या राजधान्यांमध्ये जाऊन भारताची बाजू मांडतील. या खासदारांच्या शिष्टमंडळात पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसचे खासदार व माजी भारतीय क्रिकेटपटू युसूफ पठाण यांचं देखील नाव होतं. मात्र, ते या शिष्टमंडळाबरोबर जाणार नाहीत.



युसूफ पठाण यांनी स्वतःच केंद्र सरकारला सांगितलं आहे की ज्या काळात हे शिष्टमंडळ दौरे करणार आहे त्या काळात मी उपलब्ध नाही. केंद्र सरकारने युसूफ पठाण यांच्याशी थेट संपर्क साधला होता. मात्र युसूफ यांनी ते उपलब्ध नसल्याचं कारण सांगितलं आहे. तृणमूल काँग्रेसने युसूफ यांना असं कारण देण्यास सांगितलं असावं असा सूर भाजपा नेत्यांमधून उमटू लागला आहे.

केंद्र सरकारने तृणमूल काँग्रेसशी संपर्क न करता थेट युसूफ पठाण यांच्याशी संपर्क साधला होता. मात्र, पठाण यांनी केंद्राला नकार कळवला आहे. दुसऱ्या बाजूला, तृणमूल काँग्रेसने परराष्ट्र धोरणावरून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. परराष्ट्र धोरण हा भारत सरकारचा विषय आहे. यांची संपूर्ण जबाबदारी केंद्र सरकारनेच घेतली पाहिजे, असं म्हणत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षाने केंद्र सरकारच्या शिष्टमंडळापासून अंतर राखलं आहे.

## आर.एस.एस.मुख्यालयावरील हल्ल्याचा सूत्रधार सैफुल्लाचा १९ वर्षांनंतर खात्मा

### संघ वर्तुळातून 'अज्ञात' व्यक्तीच्या कृतीचे स्वागत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९नागपूर**

२००६ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर झालेल्या हल्ल्याचा मास्टरमाइंड रजाउल्ला निजामनी खालिद उर्फ अबू सैफुल्ला याचा पाकिस्तानमध्ये खात्मा करण्यात आला. नागपुरातील त्या हल्ल्याचा तब्बल १९ वर्षांनंतर अज्ञातांनी बदला घेतल्याच्या कृतीचे संघ वर्तुळातून स्वागत करण्यात येत होते. संघाकडून मात्र याबाबत अद्यापही अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.





२००६ च्या मे महिन्यात संघाच्या तृतीय वर्ष वर्गाला सुरुवात झाली होती. रेशीमबागेत वर्ग सुरू होता व त्यानिमित्ताने संघाचे अनेक तत्कालीन पदाधिकारी नागपुरात होते. संघ कार्यकर्त्यांना घडविणारा वर्ग सुरू असतानाच हल्ला करण्याचा कट अबू सैफुल्लाने रचला होता. तत्कालीन सरसंघचालक के. सी. सुदर्शन व सरकार्यवाह डॉ. मोहन भागवत त्यावेळी मुख्यालयात नसले तरी इतर मोठे पदाधिकारी संघ मुख्यालयात होते. १ जून २००६ रोजी पहाटे चार वाजता तीन दहशतवादी लाल दिवा असलेली म्बेसेडर गाडी घेऊन संघ मुख्यालयाकडे निघाले होते.सुरक्षा यंत्रणेतील जवानांनी गाडीला थांबण्याचा इशारा केला होता. मात्र गाडी बॅरिकेड्स तोडून समोर निघाली होती. आत बसलेल्या तीनही दहशतवाद्यांजवळ एके ५६ पाहून नागपूर पोलीस व सुरक्षा यंत्रणांनी गाडीचा पाठलाग केला.

आरोपींनी गोळीबार केला व चकमकीत अफजल अहमद बट, बिलाल अहमद आणि मोहम्मद उस्मान हबीब हे तिघेही मारले गेले होते. नागपूर पोलिसांच्या या कारवाईचे मोठे कौतुक झाले होते व त्यांच्या तत्परतेमुळे संघ मुख्यालय वाचले होते.या घटनेमुळे प्रचंड खळबळ उडाली होती. नागपूरमध्ये झालेला तो पहिलाच मोठा दहशतवादी हल्ला होता. सैफुल्ला हा लष्कर-ए-तोएबाच्या अबू अनसचा उजवा हात होता. सैफुल्लाने संघ मुख्यालयावरील हल्ल्याचा कट रचला होता. त्याने तीनही दहशतवाद्यांना प्रशिक्षण देऊन संघ मुख्यालयावर हल्ला करण्यासाठी पाठविले होते. दहशतवाद्यांकडून तीन एके ५६ रायफली, पाच किलो आरडीएक्स, १४ हँडग्रेनेड होते. कारमधून पोलिसांनी एक टिफिन बॉम्बदेखील जप्त केला होता. इतक्या मोठ्या प्रमाणात दारूगोळा वापरून संघ मुख्यालय उडविण्याचेच टार्गेट घेऊन आरोपी आल्याचे स्पष्ट झाले होते.

## पाकिस्तानकडून सुवर्ण मंदिराला लक्ष्य भारतीय लष्कराने फसवले...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमृतसर**

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात तणावाची स्थिती निर्माण झाली होती. यानंतर भारतीय लष्कराने पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला होता. यानंतर पाकिस्तानकडून पंजाबमधील अमृतसर येथील सुवर्ण मंदिरावर क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्स यांनी हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याची बाब समोर आली आहे. दरम्यान १५ व्या इन्फंट्री डिव्हिजनचे जनरल ऑफिसर कमांडिंग (जीओसी) मेजर जनरल कार्तिक सी शेषाद्री यांनी याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. त्यांनी सोमवारी लष्कराच्या हवाई संरक्षण दलाच्या गनर्सनी सुवर्ण मंदिराला लक्ष्य करत सोडलेले सर्व ड्रोन्स आणि क्षेपणास्त्रे कशी पाडली याबद्दल खुलासा केला आहे .



मेजर जनरल म्हणाले की, भारतीय लष्कराला आधीच अपेक्षित होते की पाकिस्तान हा लष्करी तळ यासह नागरी वसाहती आणि धार्मिक स्थळे, जसे की सुवर्ण मंदिर यांना लक्ष्य करेल. ते म्हणाले की, त्यांच्याकडे लक्ष्य करण्यासाठी रास्त लक्ष्य नाही हे माहिती असल्याने, आम्ही अंदाज बांधला की ते भारतीय लष्कराचे तळ, नागरी वस्त्या यासह धार्मिक स्थळांना लक्ष्य करतील. यापैकी सुवर्ण मंदिर हे सर्वात ठळक लक्ष्य असल्याचे दिसून आले. सुवर्ण मंदिराला संपूर्ण एअर डिफेन्स अम्ब्रेला कव्हर देण्यासाठी आम्ही अतिरिक्त अधुनिक हवाई सुरक्षा यंत्रणा तैनात केली. पुढे त्यांनी असेही सांगितले की, पाकिस्तानकडून ८ मे रोजी मोठ्या प्रमाणात मानवरहित एरियल शस्त्रांनी हवाई हल्ला केला गेला, ज्यामध्ये प्रामुख्याने ड्रोन्स आणि लाँग-रेंज क्षेपणास्त्रांचा समावेश होता.

आम्हाला हे अपेक्षितच असल्याने आम्ही पूर्णपणे तयार होतो आणि आमच्या धाडसी आणि सजग आर्मी एअर डिफेन्स गनर्सनी पाकिस्तानी लष्कराची दुष्ट योजना निष्फळ केली आणि सुवर्ण मंदिराला लक्ष्य करत सोडलेले सर्व ड्रोन आणि क्षेपणास्त्रे हाणून पाडली. अशा पद्धतीने आपल्या पवित्र सुवर्ण मंदिरावर एकही ओरखडा येऊ दिला नाही, असेही ते म्हणाले.

आकाश मिसाईल सिस्टम, एल-७० एअर डिफेन्स गन्स यांच्यासह इंडियन एअर डिफेन्स सिस्टमने कशा प्रकारे अमृतसह येथील सुवर्ण मंदिर आणि पंजबमधील शहरांना पाकिस्तानी क्षेपणास्त्रे आणि ड्रोन हल्ल्यांपासून वाचवले याचे प्रात्यक्षिक भारतीय लष्कराने सोमवारी सादर केले.

## जिथे होते लष्कर-ए-तोयबाचे तळ, तिथेच १४ दिवस प्रशिक्षण घेत होती ज्योती मल्होत्रा

### हरियाणातील हिसार पोलिसांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९हिसार हरियाणा**

पहालगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' करून चोख उत्तर दिलं. या दरम्यान भारत आणि पाकिस्तानात संघर्ष निर्माण झाला होता. यानंतर आता पुन्हा देशात मोठी खळबळ उडाली आहे. भारताची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पोहोचवणाऱ्या ज्योती मल्होत्राला पोलिसांनी अटक केली. तिच्याबद्दल आता आणखी एक मोठा खुलासा झाला आहे. लष्कर-ए-तोयबाचं मुख्य प्रशिक्षण केंद्र मुरीदके, जे भारताने उद्ध्वस्त केलं, तिथेच ज्योती मल्होत्राने हेरगिरीचे प्रशिक्षण घेतले आहे. प्रशिक्षणानंतर, तिला येथून पुढील मोहिमेसाठी भारतात पाठवण्यात आले. पण मिशन सुरू करण्यापूर्वीच तिला हरियाणा पोलिसांनी पकडले. पहलगाम हल्ल्याच्या काही दिवस आधी युटच्यूबर ज्योती मल्होत्रा पाकिस्तानला गेली होती. या काळात तिने मुरीदकेमध्येच १४ दिवस घालवले.

हरियाणातील हिसार पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हा खुलासा ज्योतीने स्वतः चौकशीदरम्यान केला.



मात्र, या चौकशीतून अद्याप हे स्पष्ट झालेले नाही की, ती मुरीदकेहून कोणत्या मोहिमेवर भारतात परतली होती. या मोहिमेत त्याच्याशिवाय आणखी किती लोक आहेत? या संदर्भात हिसार पोलीस तिची चौकशी करत आहेत. सध्या ज्योती मल्होत्रा पाच दिवसांच्या पोलीस कोठडीत आहे. पोलिसांचा दावा आहे की, या मोहिमेत ज्योती एकटीच सहभागी नाही, तर २० हून अधिक लोक यात सहभागी आहेत. हे सर्व २० लोक सोशल मीडिया इन्फ्लुएंसर असल्याचे सांगितले जात आहे.

ज्योती मल्होत्राला पाकिस्तानात जाण्यासाठी कोणतेही प्रतिबंधित क्षेत्र नव्हते. ती पाकिस्तानात जिथे वाटेल तिथे मुक्तपणे प्रवास करत असे. पाकिस्तान पोलिसांनी स्वतः तिच्या सुरक्षेची व्यवस्था केली होती. तिने अशा अनेक ठिकाणी भेट दिली, जिथे सामान्य भारतीयांना जाण्यास मनाई आहे. यामध्ये पाकव्याप्त काश्मीरचे काही भाग, इस्लामाबाद, कराची आणि मुरीदके येथील काही ठिकाणांचा समावेश आहे. भारतातील पाकिस्तानी उच्चायुक्तालयात तैनात असलेल्या एहसान-उर-रहीम उर्फ दानिशच्या सूचनेवरून पाकिस्तानी गुप्तचर संस्थेचा अधिकारी शाकीर याने त्याला ही सुविधा पुरवली होती.

**पहलगाम हल्ल्यात सहभागी असल्याचा संशय**

पहलगाम हल्ल्यातही ज्योतीचा हात असू शकतो, अशी शक्यता हिसार पोलिसांनी व्यक्त केली आहे. मात्र, चौकशीदरम्यान तिने हे नाकारले आहे. ज्योती मल्होत्रा पहलगाम हल्ल्याच्या तीन दिवस आधी काश्मीरमध्ये होती. या काळात, ती पहलगाममधील त्या ठिकाणीही गेली, जिथे दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांना त्यांचे नाव आणि धर्म विचारून गोळ्या घातल्या होत्या. ऑपरेशन सिंदूर दरम्यानही ज्योती पाकिस्तान दूतावासातील अधिकारी दानिशच्या संपर्कात होती.

## राज्यातील तब्बल आठ हजारांहून अधिक गावांत शाळाच नाही; केंद्राने शैक्षणिक परिस्थिती सुधारण्याचे दिले निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

एकीकडे कमी पटसंख्येमुळे शाळांचे समायोजन सुरू असतानाच राज्यातील ८,२१३ गावांत अजूनही प्राथमिक शिक्षण देणारी एकही शाळा अस्तित्वात नाही. तेथील मुलांच्या शिक्षणाचे काय? हा प्रश्न आहे. केंद्रीय शिक्षण सचिवांनी या गंभीर शैक्षणिक दुरवस्थेवर लक्ष वेधत परिस्थितीत सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत.

नुकतीच २०२५-२६ साठी समग्र शिक्षण अभियानाच्या अर्थसंकल्प नियोजनासाठी ऑनलाइन पद्धतीने बैठक झाली. यात शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील, राज्य उपसंचालक डॉ. रमाकांत काठमोरे, अनेक विभागांचे शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह संघटनांचे पदाधिकारी सहभागी होते.



२०२४-२५ या वर्षात ३०,०२६९ शाळाबाह्य मुलांना पुन्हा शाळेत दाखल करण्यात आले. नव्या सत्रामध्ये ३०,११६ शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व्यवस्थापन समितीच्या मदतीने विशेष मोहीम राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत, तसेच या मुलांची प्रगती प्रबंध पोर्टलवर नोंदवण्याचे निर्देशही देण्यात आले.विद्यार्थिसंख्येतील घट : शाळांची पटसंख्या १ कोटी ६३ लाख ३२ हजार ११७ वरून आता १ कोटी ५० लाख १८ हजार १७१ इतकी कमी झाली. म्हणजेच वर्षभरात १२ लाख ३२ हजार ९३८ विद्यार्थी घटले.

### जिल्हानिहाय प्रस्ताव

सांगली १४२, चंदपूर ९०, नाशिक ५५, अमरावती ६, अहिल्यानगर ४७, छत्रपती संभाजीनगर ६९, धाराशिव ४३, ठाणे ३५, परभणी ५९, पुणे १२, बुलढाणा ५४ ,बीड ८६, रायगड ४, रत्नागिरी ६३, यवतमाळ ५५, हिंगोली ४५, कोल्हापूर ५, सिंधुदुर्ग ४, सोलापूर ७२, सांगली ११, सातारा ३, चंद्रपूर १८, जळगाव ४०, जालना २१, धुळे ८, नंदुरबार ८,नांदेड १५,नाशिक १९, पालघर ३०.

## पाक विरोधात सर्वपक्षीय शिष्टमंडळ पाठवण्याच्या मुद्यावर शरद पवारांचे संजय राऊतांना खडेबोल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९मुंबई**

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने पाकच्या कुरापतींविरोधात विविध देशांत सर्वपक्षीय नेत्यांचे शिष्टमंडळ पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी यावर टीका केली होती. त्यानतंर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी या प्रकरणी पक्षीय राजकारण करण्याची काहीही गरज नसल्याचे ठणकावून सांगत संजय राऊतांना खडेबोल सुनावलेत.

मोदी सरकारने ऑपरेशन सिंदूर व दहशतवादाच्या मुद्यावरील आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी एक सर्वपक्षीय शिष्टमंडळ विविध देशांत पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. या शिष्टमंडळात शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह विविध नेत्यांचा समावेश आहे. संजय राऊत यांनी या शिष्टमंडळाचा उल्लेख वऱ्हाड असा केला होता. तसेच इंडिया आघाडीतील या शिष्टमंडळातील सदस्यांना या वऱ्हाडावर बहिष्कार टाकण्याचेही आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी संजय राऊत यांचा समाचार घेतला आहे.

## संपादकीय ......

# फुटीरतावादी शक्तींना इशारा

*पाकिस्तानने भारताच्या सीमेलगत शहरांना, नागरी वस्त्यांना लक्ष्य केलेले तुर्की ड्रोन्स परतवून लावत भारतीय सैन्यदलाने 'ऑपरेशन सिंदूर'अंतर्गत पाकिस्तानात घुसून लष्करी तळ उद्ध्वस्त केले. नव्हे, पाकिस्तानच्या लष्कराची लक्तरे वेशीवर टांगण्याचे काम केले. या धडक कारवाईने सर्वच फुटीरतावादी शक्तींना एक सूचक इशारा मिळाला आहे.*

*भारताच्या लष्करी कारवाईने पाकिस्तानी राजवटीची हाडे खिळखिळी झाली आहेत; पण लष्कराने केलेल्या कारवाईत एका दगडामध्ये पाकिस्तानसह अनेकांना इशारा दिला आहे. हा इशारा भारताची कुरापत काढू इच्छिणार्या शक्तींना पुरेसा आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी २६ निष्पापांची हत्या केली. या दहशतवादी कारवायांमागे पाकिस्तान असल्याचे स्पष्टपणे पुढे आले. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय लष्कराच्या हालचाली सुरू होत्या. यादरम्यान विखारी राजकारणाने प्रभावित झालेल्या काही शक्तींनी भारताने पाकिस्तानला गुडघे टेकविण्यास भाग पाडल्यानंतरही भारत शस्त्रसंधी करण्यासाठी अमेरिकेच्या दबावाला बळी पडला, असा विषारी प्रचारही सुरू केला. देशाच्या परराष्ट्रमंत्र्यांनी याविषयी पारदर्शक असे स्पष्टीकरणही दिले. तसेच पंतप्रधान मोदी यांनीही भारत कोणाच्याही दबावाला भीक घालणार नाही आणि यापुढे आण्विक युद्धाची धमकी कदापि सहन करणार नाही, असे जगापुढे स्पष्ट केले. यामुळे भारताने पाकिस्तानविरोधात कारवाई करून एकप्रकारे जगातील राष्ट्रांनाही विशेषतः सीमेवरील चीनलाही संदेश दिला आहे.*

*भारतीय लष्कराचा हा संदेश जागतिक पटलावर पाकिस्तानची तळी उचलणार्या काही मुस्लीम राष्ट्रांनाही आहे. कोणत्याही स्थितीला भारत सामोरे जाऊ शकतो, याचे उदाहरणही भारताने जागतिक महासत्तांपुढे ठेवले आहे. तसेच केवळ भारताच्या कृपेने स्वातंत्र्य मिळविलेल्या आणि इस्लामच्या नादामध्ये हिंदूंना लक्ष्य करणार्या शेजारील बांगला देशालाही हा एक प्रकारचा सज्जड दम आहे; पण त्याहीपेक्षा भारतात विविध राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या फुटीरतावादी शक्तींनाही तो एक कडक संदेश समजला जात आहे. भारतामध्ये पूर्वोत्तरी राज्यात गेल्या काही वर्षांपासून अशांतता आहे. दक्षिणेकडील तामिळनाडू, केरळ या पूर्वीच्या द्रवीडस्तानातील राज्यांनाही सध्या स्वायत्ततेचे डोहाळे लागले आहेत. भाजप सरकार सत्तेत आल्यापासून पूर्वोत्तर राज्यांमध्ये फुटीरतावाद्यांच्या कारवायांवर काही प्रमाणात अंकुश बसला असला, तरी उत्तर पूर्वेतील आठ राज्यांमध्ये या कारवाया अधूनमधून डोके वर काढतात. या राज्यांमध्ये कार्यरत असलेल्या फुटीरतावादी संघटनांना चीनकडून रसद मिळते आणि त्याच्या जोरावर राज्य वेगळे करून चीनमध्ये समाविष्ट करण्याची स्वप्ने या फुटीरतावादी शक्ती पाहतात. या शक्तींना भारतीय सेना दलाच्या कारवाईने ७२ तासांत पाकिस्तान हालवून सोडले जाते, तर फुटीरतावाद्यांच्या मुसक्या बांधण्यासाठी किती वेळ लागेल, याचे गणितही फुटीरतावाद्यांपुढे मांडले आहे.७५ वर्षांपूर्वीचे भारतीय लष्कर आणि लष्कराची आजची स्थिती यामध्ये देशापोटी त्याग, निष्ठा आणि समर्पणाची भावना कायम असली, तरी तंत्रज्ञानाच्या अंगाने भारतीय लष्कर प्रचंड सक्षम झाले आहे. भारत आर्थिकदृष्ट्या मजबूत होताना विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही कोसो मैल पुढे गेला आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या उरात धडकी भरली आहेच शिवाय शेजारील बांगला देशला या सामर्थ्याची कल्पना आली असेल; परंतु त्याहीपेक्षा देशाशी गद्दारी करून देशाचे सार्वभौमत्त्व धोक्यात आणणार्या फुटीरतावादी शक्तींसाठी हा एक मोठा धडा आहे. त्यातून त्यांनी बोध घेणे आवश्यक आहे अन्यथा त्यांचीही गय नाही, हा सूचक इशारा भारतीय सैन्यदलाच्या कारवाईमागे आहे.*

# अमरावती ग्रामीणमध्ये ड्रोन वापरास मनाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि१९अमरावती–** पहलगाम येथील हल्लयाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेचा उपाय म्हणून जिल्ह्यात ड्रोन आणि या प्रकारचे हवाई साधने वापरण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. हे प्रतिबंध दि. ३१ मे पर्यंत लागू राहणार आहेत.भारतीय लष्कराने पाकिस्तानी दहशतवादी संघटना जैश–ए–मोहम्मद, लष्कर–ए–तैयबा आणि हिजबुल मुजाहिद्दीन यांच्या ठिकाणांवर केलेल्या कारवाईनंतर, अमरावती ग्रामीण पोलिसांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. १० मे रोजी भारताने शस्त्रसंधीची घोषणा केली आणि ऑपरेशन सिंदूर स्थगित करण्यात आले. मात्र, दहशतवादी संघटनांनी त्यांचे भारतात असलेले गुप्त समर्थक आणि स्लीपर सेल्स सक्रिय करून सूड घेण्यासाठी घातपात घडवण्याची शक्यता आहे. यासाठी ड्रोन, रिमोट नियंत्रित मायक्रो लाईट एअरक्राफ्ट, पॅरा मोटर, पॅरा ग्लायडर, हँग ग्लायडर, हॉट एअर बलून यांसारख्या साधनांचा वापर केला जाऊ शकतो, अशी शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.या पार्श्वभूमीवर, अमरावती ग्रामीण भागात सार्वजनिक शांतता व



सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था जतन करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली आहे. त्यानुसार दि. ३१ मे पर्यंत अमरावती ग्रामीण हद्दीत सार्वजनिक ठिकाणी ड्रोन, रिमोट नियंत्रित मायक्रो लाईट एअरक्राफ्ट, पॅरा मोटर, पॅरा ग्लायडर, हँग ग्लायडर, हॉट एअर बलून यांसारखी साधने जवळ बाळगण्यास व वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. हा मनाई आदेश भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ (१) (३) अन्वये जारी करण्यात आला आहे.या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार कारवाई केली जाईल, असे अमरावती ग्रामीणचे प्रभारी पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांनी या आदेशाचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# अवकाळी पावसाचा मुक्काम वाढला ! शेतकऱ्यांनो सावधान

# नागपूर,अमरावती मध्ये मध्यम पाऊस होण्याचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ पुणे–** राज्यात अवकाळी पावसाचा मुक्काम वाढला असून, पुढील काही दिवस मुसळधार पावसाची शक्यता आहे.या कालावधीत कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांत मध्यम ते हलक्या स्वरूपाचा पाऊस, विजांचा कडकडाट आणि ५० ते ६० किमी/तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा आणि कोल्हापूरसह अनेक जिल्ह्यांसाठी यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केले आहेत.तर, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड, तसेच विदर्भातील नागपूर आणि अमरावती येथेही मध्यम पाऊस होण्याचा अंदाज देण्यात आला आहे.

दरवर्षी मे महिन्यात उन्हाचा प्रचंड कडाका जाणवत असतो. यंदा मात्र हवामानात बदल झाला असून, मेमध्ये सर्वत्र अवकाळी पाऊस होत आहे.गेल्या आठवड्यात राज्यातील विविध भागांत अवकाळी पावसाने मुसळधार हजेरी लावली होती. त्यानंतर आता राज्यात पुन्हा एकदा अवकाळी पावसाचा मुक्काम वाढला




आहे.

**अंदमानात मान्सूनचे आगमन**

अंदमान निकोबार बेटांवर मान्सूनचे आगमन झाले असून, या ठिकाणी सध्या हलक्या स्वरूपाचा पाऊस होत आहे.

यानंतर पुढील तीन ते चार दिवसांत मान्सून दक्षिण बंगालच्या उपसागरात आणि अंदमानात वाटचाल करणार आहे.

नियोजित वेळेच्या एक आठवडा आधीच मान्सून अंदमानात दाखल झाला आहे.

पुढील काही दिवसांत मान्सून दक्षिण अरबी समुद्र, मालदीव, अंदमान निकोबारसह मध्य बंगालच्या उपसागरात विस्तार करेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

यानंतर हळूहळू केरळ आणि महाराष्ट्राकडे मान्सून वाटचाल सुरू करण्याची शक्यता आहे.




# उशी न घेता झोपण्याची लावा सवय, मिळतील इतके फायदे ज्यांचा विचारही केला नसेल!

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक**


झोपताना डोक्याखाली उशी घेणं ही आजकाल सगळ्यांची सवय झाली आहे. उशी नसेल तर अनेकांना झोपही येत नाही. कीह लोक तर डोक्याखाली दोन दोन उश्या घेतात. पण ते हा विचार करत नाहीत की, याचा त्यांच्या आरोग्यावर काय परिणाम होईल. तसंच पाहिलं तर डोक्याखाली उशी न घेता झोपण्याचे आरोग्याला अनेक फायदे मिळतात. तेच आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. जर तुम्हाला आरोग्य चांगलं ठेवायचं असेल तर या टिप्स नक्की फॉलो करा.

**पाठीच्या कण्याला मिळेल आराम–** जर तुमचा पाठीचा कणा फार आधीपासून दुखत असेल तर काही दिवस उशी न वापरता झोपून बघा. तज्ज्ञ सांगतात की, उशीचा वापर केल्याने आपली मान आणि पाठीच्या कण्याचा तणाव वाढतो. त्यामुळे अनेकदा मानेचा त्रास व्हायला लागतो. त्यामुळे उशी न वापरणे हा चांगला पर्याय ठरू शकतो.

**त्वचेसंबंधी फायदा–** उशीचा सतत वापर केल्याने त्वचेवर सुरकुत्या पडू शकतात. कारण उशीमुळे चेहऱ्यावर दबाव पडतो. जे लोक उशीचा वापर करत नाहीत, त्यांना ही समस्या होत नाही. उशी न वापरल्याने पिंपल्स येण्याची समस्याही कमी होते. कारण उशीचे कव्हर नेहमी धुतले जात नाहीत, त्यामुळे त्यातील धुळ–कण यांमुळे चेहऱ्यावर पिंपल्स येतात.

**मानेचं दुखणं होईल कमी**

जेव्हा आपण उशीचा वापर करतो तेव्हा आपल्या पाठीच्या कण्याची स्थिती बदलते. अशात सतत पाठीदुखीची समस्या होऊ लागते. तसेच उशी न वापरता झोपल्याने मान योग्य दिशेने राहते




आणि यामुळे पाठदुखीची समस्या होण्याचाही धोका राहत नाही.

**चांगली झोप लागते–** उशी डोक्याखाली घेऊन झोपल्याने अनेकदा काही लोकांना थकवा जावणतो. याचा अर्थ तुमची चांगली आणि पुरेशी झोप होत नाहीये. जेव्हा एखादी व्यक्ती उशीचा वापर न करता झोपली तर त्याची चांगली झोप होऊ शकते. तसेच इतरही काही समस्या दूर होतात. झोप पूर्ण झाल्यवर तुम्हाला नक्कीच फ्रेश वाटतं.

**मानसिक आरोग्य–** जर उशी बरोबर नसेल तर तुम्हाला डिस्टर्ब स्लीपची समस्या होऊ शकते. जर तुम्ही उशीचा वापर करत नसाल तर तुम्हाला चांगली झोप येऊ शकते. ज्यामुळे तुमचा सर्व थकवा दूर होतो. तणाव कमी होतो. अर्थातच तणाव आणि थकवा तुम्हाला नसेल तर मानसिक आरोग्य चांगलं राहतं.

# हळद पिक घेण्याचा विचार करताय? कधी व कशी कराल लागवड? जाणून घ्या सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**

**दि.१९ विदर्भ प्रजासत्ताक**

हळद लागवड करण्यासाठी योग्य वेळ १५ मे ते जूनचा पहिला आठवडा आहे. हळद पिकाच्या रोगमुक्त व कीडमुक्त उत्पादनासाठी खालील उपाययोजना कराव्यात.

**हळद लागवड पूर्वनियोजन**

पाण्याची उपलब्धता असलेल्या ठिकाणी हळद लागवडीसाठी जमिनीची नांगरणी करून ढेकळे फोडून प्रती गुंठा २५० ते ४०० किलो चांगले कुजलेले शेणखत मातीत मिसळावे. इतर पिकांचे अवशेष व धसकटे वेचून जमीन स्वच्छ करावी.

हळदीची लागवड मे ते जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत केल्यास चांगले उत्पादन मिळते.

हळदीची लागवड सरी वरंबा पध्दतीने करताना ७५ सें.मी. अंतरावर सऱ्या पाडाव्यात.

सरीच्या दोन्ही बाजूला दोन गड्ड्या मध्ये ३० सें.मी. अंतर ठेवून लागवड करावी.

रुंद सरी वरंबा पद्धतीने लागवड करावयाची असल्यास ९० सें.मी. ते १ मीटरच्या गादीवाफ्यावर दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. ठेवून करावी.

हळद पिकास ३.७५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व १ किलो म्युरेट ऑफ पोटेश खते प्रति गुंठा लागवडीच्या वेळेस द्यावीत आणि नत्र खताची मात्रा २.५ किलो युरिया प्रति गुंठा तीन हप्त्यामध्ये विभागून लागवडीपासून दीड, तीन व साडेचार महिन्यांनी द्यावी.

हळदीच्या ओळीलगत चर घेवून त्यात खते टाकून मातीने झाकून घ्यावीत.

लागवडीसाठी जून, डोळे फुटलेले, मुळ्या विरहित मोठे गड्डे वापरावे.

किडीचा आणि बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भाव टाळण्यासाठी बीजप्रक्रिया करावी.

यासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २० मि.ली. १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावेत व या द्रावणात बियाणे १५ ते २० मिनिटे बुडवून घेवून सावलीत सुकवून लागवडीसाठी वापरावे.

साधारणतः २५ किलो बियाणे प्रती गुंठा लागते.

हळदीची लागवड करताना जमीन वाफसा स्थितीत असताना किंवा पाणी देवून करावी.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# महावितरण चांदुर बा. उपविभाग महसूल विभागात प्रथम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती :** मुख्यमंत्री शंभर दिवसांचीकार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम अंतर्गत महावितरणचे चांदुर बाजार उपविभागीय कार्यालयाने बाजी मारत अमरावती महसूल विभागातून प्रथम क्रमांक मिळविला आहे. मुख्य अभियंता अशोक साळुंके आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांनी उपविभागीय अभियंता दिनेश भागवत व त्यांच्या संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. जिल्ह्यातील महावितरणच्या सर्वच कार्यालयाने सुधारणा उपक्रमांतर्गत ठरविण्यात आलेल्या निकषांचे अनुकरण करून महावितरणची सेवा ग्राहकाभिमुक करण्याचे आवाहन त्यांनी




केले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शंभर दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम सुरू केली. दहा विविध विषयांवर आधारित हा उपक्रम राज्यातील ३५८ तालुक्यांतील दहा हजार शासकीय कार्यालयांमध्ये लियांमध्ये राबविण्यात आला होता. शनिवारी यात महसूल विभागनिहाय कोणती कार्यालये सरस ठरली याचा निकाल जाहीर झाला. महसूल विभागनिहाय निकालात महावितरणच्या कार्यालयांतर्गत चांदूरबाजार या उपविभागीय कार्यालयाने अमरावती विभागातून प्रथम क्रमांक मिळविला आहे, तर दुसऱ्या क्रमांकावर महावितरणचे शेगाव कार्यालय राहिले.

# शेतात गाळ भरायचाय.. कुठे कराल गाळासाठी मागणी? किती मिळतंय अनुदान? जाणून घ्या सविस्तर

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

शेतकऱ्यांसाठी गाळ मागणीची प्रक्रिया आणि अनुदानासाठी 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' आणि 'नाला खोलीकरण व रुंदीकरण' या योजनांमध्ये शेतकऱ्यांचा सक्रीय सहभाग महत्त्वाचा आहे.

**कसा घ्याल योजनेचा लाभ?–** शेतकऱ्यांनी ग्रामपंचायतीशी संपर्क साधून गाळ मागणीसाठी अर्ज द्यावा.

**अनुदानास पात्र शेतकरी–** गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेंतर्गत सीमांत/अत्यल्पभूधारक (१ हेक्टर पर्यंत) आणि लहान शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंत) हे शेतकरी अनुदानास पात्र राहतील. विधवा शेतकरी, अपंग शेतकरी व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला, जरी जास्त जमीन धारण करत असले, तरीही ते अनुदानास पात्र राहतील. शेतात गाळ भरायचाय.. कुठे कराल गाळासाठी मागणी? किती मिळतंय अनुदान? जाणून घ्या सविस्तर

**अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे–** ७/१२ उतारा (शेतजमिनीचा दाखला), आधार कार्ड आणि बँक खात्याचा तपशील., शेतकरी सीमांत/




अल्पभूधारक (१ हेक्टर पर्यंत), लहान (१ ते २ हेक्टर पर्यंत), विधवा, अपंग आहेत का याचे प्रमाणपत्र, किंवा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे कुटुंब असलेल्यांसाठी प्रमाणपत्र.

यानंतर गाळ मिळण्यास पात्र शेतकऱ्यांची यादी तयार होईल शासनाने निर्धारित केलेल्या निकषांनुसार ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासन लाभार्थ्यांची यादी तयार करेल. लाभार्थी शेतकऱ्यांची यादी ग्रामसभेमध्ये जाहीर केली जाईल.

**गाळ वाहतुकीसाठी अनुदान मंजुरी आणि वितरण**

'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या योजनेंतर्गत गाळ वाहून नेणाऱ्या पात्र शेतकरी लाभार्थ्यांना प्रती एकर रु. ३५.७५/प्रती घनमीटर याप्रमाणे रु. १५,०००/– च्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. हे अनुदान फक्त अडीच एकर पर्यंत म्हणजेच रु. ३७,५००/– अधिकाधिक देय राहील.

हे अनुदान थेट बँक खात्यात जमा केले जाईल.

**गाळाचा वापर–** शासनाच्या नियमानुसार, गाळ शेतातच वापरणे आवश्यक आहे.

**महत्त्वाचे मुद्दे–** सीमांत/अत्यल्पभूधारक, लहान, विधवा, व अपंग शेतकऱ्यांना आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला अधिक प्राधान्य दिले जाईल. गाळ फक्त शेतीसाठीच वापरता येईल, त्याची विक्री किंवा इतर ठिकाणी वाहतूक करण्यास मनाई आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून ग्रामपंचायतींनी या योजनेबाबत शेतकऱ्यांना अधिकाधिक माहिती द्यावी आणि त्यांच्या सहभागास प्रोत्साहन द्यावे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १९ मे २०२५ | शहर/ग्रामिण

# मेळघाटात १७० गावे अंधारात, ५० घरांची पडझड, २ जखमी







## दुनी, चार्कदा,सुर्सदा, घुघाटरोड, तलई,हिराबंबईमध्ये दाणादाण

### वीज कोसळून बैल, गायीसह पाच जनावरांचा मृत्यू ..

### अनेक गावात शाळेवरील छत उडाली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९धारणी** गेल्या दोन दिवसात वादळ आणि अवकाळी पावसामुळे धारणी तालुक्यात दाणादाण उडाली असून जनजीवन अस्त-व्यस्त झालेले आहे. रविवारी दुनी गावातील ज्ञानमंदिर माध्यमिक शाळा व नानासाहेब भिसे कनिष्ठ महाविद्यालय तथा चाकर्दा येथील शाळेची टिन उडाल्याने दोन जण जखमी झाले. धारणी, दुनी, चाकर्दा, तलईसह अनेक गावात घरांची पडझड झालेली आहे. तर १७० पेक्षा अधिक गावांची विज बंद पडलेली आहे.

झापल गावात दौन बैलांचा मृत्यू झाला. दुनी फाट्यावरील बसस्टँड कोसळले असून दादरामध्ये स्वस्त धान्याच्या दुकानातील ८० क्विंटल धान्य ओले झाले.

धारणी तालुक्यातील गेल्या दोन दिवसात वादळी पावसामुळे दादरा, हिराबंबई, दुनी, चाकर्दा, सुसर्दा, तलई,

### अनेक भागात विजेचे खांब पडले

धुळघाटरोड गावात प्रकृतीने कहरच केलेला असून अनेक पाळीव प्राणी मेले तर पन्नास पेक्षा जास्त घरांची पडझड झाली.

दुनी गावातील ज्ञान मंदिर शाळेचे टिनपत्रे उडाले तर विनोद गोसावी व अमृत धुर्वे जखमी झाले. याशिवाय दुनी फाट्यावरील बसस्टॅड पूर्णपणे कोसळले, धारणीत सोलरचे पॅनलचे स्टैंड पोस्ट धाराशाही असले तर अनेक घरांची टिनपत्रे उडाली.

## वरूड तालुक्यात वादळी पावसाचे थैमान

रविवारी सायंकाळी पावणेपाचच्या सुमारास अचानक शहरात वादळी पावसाला सुरुवात झाली. यामुळे अनेकांचे दुकानांचे फलक, घरावरील टिनाचे छप्पर उडाले. स्थानिक ओम मोटर्समध्ये मेकॅनिक वाहन दुरुस्त करीत असताना अचानक वादळी पावसात निंबाचे झाड तेथे उभ्या करण्यात आलेल्या कारवर कोसळले. यावेळी नशीब बलवत्तर म्हणून मेकॅनिक वाचला. मात्र, कारचे सात ते आठ लाखांचे नुकसान झाले. येथे तीन कार झाडाखाली दबल्या गेल्या. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहासमोरही निंबाचे झाड कोसळले. जवळच प्रवासी निवारा असल्याने दहा ते पंधरा लोक तेथे आश्रयाला होते. लिंबू सरबतच्या वाहनावर झाड कोसळले. तथापि, नागरिकांनी भीतीने वाट मिळेल तिकडे पळ काढून जीव वाचविण्याचा प्रयत्न केला.

## १७० गावात अंधार

अनेक गावात उन्हाळी मुगाच्या पिकाला नुकसान झाले. धारणी तालुक्यातील हिराबंबई, सुसर्दा, दुनी, चाकर्दा, तलई कॅम्प, दादरा, धुळघाट रोड, झापल सर्वाधिक प्रभावित झालेले आहेत. महावितरणच्या धारणी विभागातील १७० गावांमध्ये अंधार पसरलेले आहे. तात्काळ पंचनामे करून नुकसानीचा अंदाज घेण्याची मागणी आहे. झापल गावातील सोहनच्या शेतातील दोन बैलांवर विज पडल्याने दोन्ही बैलांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.

## अनेक गावात विजेचे खांब कोसळले

नविन सुरू असलेल्या बांधकामाची भिंत पडली. धुळघाट रोड गाव शिवारातील शेतीत मुगाचे कापून ठेवलेले पिक खराब झाले. दादरा येथील अनेक घरांची पडझड झाली. तर स्वस्त धान्य दुकानदार केरासिंग चौहानच्या दुकानात ठेवलेले ८० क्विंटल स्वस्त धान्य पाण्याने ओले झाले. अनेक गावात विजेचे खांब पडल्यामुळे दुपारी साडेतीन पासून विजेचा पुरवठा बंद पडलेला आहे.

# राणा सोबत असतील, तर भाजपशी युती नकोच !



## आ. संजय खोडके स्पष्टच बोलले त्यांच्यासोबत आमचा ताळमेळ बसूच शकत नाही आम्ही स्वतंत्र निवडणूक लढणार

इतर मित्र तेढ निर्माण करणारेभाजपाशी संबंधित इतर घटक संघटना या जाती आणि धर्मातद्वेष निर्माण करणाऱ्या असल्या तरी भाजपा सर्वांना सामावून घेणारा पक्ष आहे. अमरावतीत भाजपाचे इतर मित्र हे दोन धर्मात तेढ निर्माण करणारे आहेत, अशी टीका संजय खोडके केली. तसंच, राणा सोबत असतील तर आम्ही भाजपासोबत युतीचं करणार नाही, असं देखील संजय खोडके म्हणाले.

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती : -** भाजपच्या कार्यक्रमात शनिवारला भाजप नेत्या माजी खा. नवनित राणा यांनी 'एकला चलो रे' ची भाषा वापरल्यानंतर रविवारला आणखी एक शाब्दिक बाण सुटला. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीवरून अमरावतीचे राजकारण तापायला सुरुवात झालीय. या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आणि विधानपरिषदेचे आमदार संजय खोडके यांनी रवी राणा आणि नवनीत राणा यांच्यावर निशाणा साधला आहे. अमरावतीत राणा यांचा पक्ष सोबत असेल तर आम्ही स्वतंत्र निवडणूक लढणार. त्यांच्यासोबत आमचं ताळमेळ बसूच शकत नाही, असे संजय खोडके यांनी आज पत्रकार परिषदेत स्पष्टपणे सांगितले.याचबरोबर,भाजपाच्यावतीनं महापालिका निवडणूक स्वतंत्र लढण्याबाबत बोललं जात असताना आमचे नेते अजित पवार यांनीही काल परवा पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस स्वतंत्र लढण्यास सज्ज आहोत असं जाहीर केलं आहे. राज्यात सत्तेवर असणाऱ्या महायुतीतील तिन्ही पक्ष जर महापालिका निवडणुकीत एकत्र येत असतील तरअमरावतीत राणा यांचा युवा स्वाभिमान पक्ष आमच्यासोबत अजिबात चालणार नाही. ही आमची स्पष्टभूमिका आहे, असं देखील संजय खोडके यांनी सांगितलं.

# नवनीत राणांच्या 'त्या' वक्तव्यामुळे युवा स्वाभिमानी चे कार्यकर्ते संभ्रमात'




## युवा स्वाभिमानी' समोर पेच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती**

आगामी महापालिका निवडणुकीत कुठल्याही पक्षासोबत युती करणार नाही, भाजप स्वबळावर सत्ता मिळवेल, असा दावा भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी केल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला असला, तरी आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचे कार्यकर्ते पेचात सापडले आहेत. युवा स्वाभिमानकडून अद्याप नवनीत राणांच्या वक्तव्यावर अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, पण युवा स्वाभिमानचे कार्यकर्ते संभ्रमित आहेत.

नवनीत राणा यांचे पती रवी राणा यांचायुवा स्वाभिमान हा महायुतीचा एक घटक पक्ष आहे. या पक्षाने भाजपला विनाअट पाठिबा दिला आहे. पण, स्थनिक पातळीवर रवी राणा यांना स्वीकारणे भाजपच्या इतर गटांना अजूनही जमलेले नाही. रवी राणा आणि माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांच्यामध्ये विस्तव जात नाही. नवनीत राणा आणिप्रवीणपोटेहे आता एका पक्षात आहेत. आमचे स्वतंत्र अस्तित्व आहे, असे रवी राणा सांगतात.नवनीत राणा आणि प्रवीण पोटे हे एका मंचावर दिसून येतात, मात्र रवी राणांसोबत एकत्र येणे पोटे टाळतात. प्रवीण पोटे यांच्याकडे आता -पर्यंत शहराध्यक्षपदाची धुरा होती. त्यांना नुकतेच पद सोडावे लागले. डॉ. नितीन धांडे यांना शहराध्यक्ष पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रवीण पोटे आणि नवनीत राणा यांच्याकडे शहरातील कोणतेही पद नाही, तरीही दोघे नेते आहेत. भाजपची सूत्रे हीराणा दाम्पत्याच्या हाती सोपवणे, हे भाजपच्या कार्यकर्त्यां नरुचणारे नाहीं. पण, वरिष्ठ नेत्यांच्या हट्टासमोर कार्यकर्त्यांनाही मान डोलवावी लागणार आहे.शहराध्यक्षांच्या पदग्रहण समारंभात नवनीत राणा यांनी भाजप स्वबळावर महापालिकेची निवडणूक लढणार अशी घोषणा केल्यानंतर भाजपच्या कार्यकर्त्यांनी टाळ्या वाजवल्या, त्याचवेळी युव स्वाभिमान पक्षाचे काय होणार? हा प्रश्न उपस्थित झाला. युवा स्वाभिमानकडू अद्याप नवनीत राणांच्या वक्तव्याव अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही, पण युवा स्वाभिमानचे कार्यकर्ते संभ्रमित आहेत.भाजपला गेल्या महापालिका निवडणुकीत ४५ जागा मिळाल्या होत्या. हे आजवरचे उच्चांकी बहुमत होते. त्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. गेल्या निवडणुकीत युवा स्वाभिमान पक्षाचे तीन नगरसेवक निवडून आले होते. या पक्षाला विस्ताराचे वेध लागले असले, तरी पक्षाच्या मर्यादा देखील आहेत. भाजपसोबत राहून पक्षाला फायदा होईल की स्वतंत्रपणे लढायचे, अशी युवा स्वाभिमानच्या कार्यकर्त्यांचीसंभ्रमावस्था आहे. रवीराणा याविषयी काय निर्णय घेतात, याकडे आता सर्वांचे लक्ष राहणार आहे. गेल्या निवडणुकीच्या वेळची भाजपची परिस्थिती आणि सद्य:स्थिती यात बराच फरक आहे. मध्यंतरीच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. शिवसेनेत झालेली फाटाफूट, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार संजय खोडके आणि सुलभा खोडके यांचे वाढलेले बळ, यातून भाजपलाही 'जागा' शोधावी लागणार आहे. महायुतीतील शिवसेना शिदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या निर्णयावर बरेच काही अवलंबून राहणार आहे.

# धारणीत वादळाचा महावितरणला मोठा फटका

## वीज वाहिन्या तुटल्या,वीज खांब पडले

### वीज दुरूस्ती कार्याला लगेच सुरूवात आणि वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती–** रविवारी संध्याकाळी साडेपाच वाजेच्या दरम्यान धारणी परिसरात वादळासह झालेल्या पावसाचा मोठा फटका महावितरणला बसला आहे. वादळाचा दबाव एवढा प्रचंड होता की,अनेक ठिकाणी झाडे उन्मळून महावितरणच्या वीज वाहिन्या/वीज खांबावर पडल्याने महावितरणची अनेक ठिकाणच्या वीज वाहिन्या पोल पडून जमिनदोस्त झाल्या आहेत. वादळाचा जोर कमी होताच महावितरणने वीज दुरूस्ती कार्याला सुरूवात केली आहे.तथापि रात्र आणि जंगलाचा भाग असल्याने दुरूस्ती कार्याला अडथळा निर्माण झाला आहे.धारणी परिसराला वीज वाहिन्यांचा बहुतांशी प्रवास हा जंगलातून आहे.त्यामुळे वादळाचा मोठा फटका महावितरणला बसला आहे.




वादळामुळे अचलपूर व धारणी परिसरातील ६ फिडर बाधित झाले आहे.यामध्ये प्रामुख्याने ११ केव्ही हरिसाल मिश्र, ११ केव्ही दुनी,११ केव्ही पाटीया,११ केव्ही धारणी,११ केव्ही कुटांगा,११ केव्ही ढाकरमल आणि ११ केव्ही दिया या मिश्र फिडरचा समावेश आहे. ११ केव्हीचे सहा आणि अंतर्गत वाहिन्या क्षतीग्रस्त झाल्याचा फटका परिसरातील अनेक गावांना बसला आहे.मुख्य अभियंता अशोक साळुंके या सर्व गोष्टीवर लक्ष ठेवून असून अधीक्षक अभियंता दिपक देवहाते आणि कार्यकारी अभियंता संजय कुटे यांच्या पुढाकाराने लगेच कामाला सुरूवात करण्यात आली आहे.वीज ग्राहकांनी या काळात सहकार्य करण्याचे आवाहन अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी केले आहे.

कर्जमाफी सह शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी

# काँग्रेसचा २१ रोजी ट्रॅक्टर मोर्चा

### काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची राहणार उपस्थिति



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ अमरावती–** शेतकऱ्यांना सहसकट कर्जमाफी द्या या मागणीसह शेतकऱ्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांसाठी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी २१ मे रोजी १० वाजता सुरू होऊन जिल्हा कचेरीवर ट्रॅक्टर मोर्चा धडकणार आहे ,शासनाने आश्वासन देऊनही शेतकऱ्यांना अद्यापही कर्जमाफी दिलेली नाही, निवडणुकीपूर्वी दिलेल्या एकही आश्वासनाची पूर्तता या शासनाने केली नाही, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव नाही ,नुकसान भरपाई ची मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नाही ,आधी विविध शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकरिता जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जयस्तंभ चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय यादरम्यान ट्रॅक्टर मोर्चा काढला जाणार आहे, या मोर्चाचे नेतृत्व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धनभाऊ सपकाळ यांच्यासह जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, खासदार बळवंत वानखडे ,माजी मंत्री यशोमती ठाकूर ,वीरेंद्र जगताप करणार आहे ,या मोर्चात शेतकऱ्यांसह काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केले,

# बडनेरा रेल्वे स्थानकावरून आईसह मुलगी बेपत्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९बडनेरा–** बडनेरा रेल्वे स्थानक येथून आईसह चार वर्षाची लहान मुलगी बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना घडली असून अमरावतीसह नागपूर पोलीस महिलेच्या शोधात आहेत. पूजा राहूल बेले (वय २२ रा. मोहाड. ता. नरखेड) व चार वर्षाची बालिका अशी बेपत्ता झालेल्यांची नावे आहेत.



पूजाचे पती राहुल बेले यांनी पत्नी व लहान मुलीला ९ मे रोजी वरुड रेल्वे स्थानक येथून बडनेरा नरखेड गाडीत बसून दिले होते. दुपारी ३.३० च्या सुमारास पत्नी व मुलगी बडनेरा रेल्वे स्थानकावर पोहचल्यावर पत्नीने पतीला फोन करून बडनेरा रेल्वे स्थानकावर पोहचल्याचे सांगितले त्यानंतर तिचा मोबाईल बंद झाला. पती राहूलने तिला सतत फोन करण्याचा प्रयत्न केला परंतु मोबाईल बंद येत होता. दुसऱ्या दिवशी सुध्दा पत्नीचा मोबाईल बंद येत असल्यामुळे पती व कुटूंबातील सदस्य घाबरले.

दरम्यान ११ मे रोजी ४ वाजताच्या सुमारास पत्नीने पतीला फोन केला आणि घरगुती सामान घेऊन अमरावतीला बोलाविले. त्यानंतर काही वेळाने पतीने पत्नीला फोन केला असता बंद आला. त्यामुळे त्यांनी सतत तिला फोन केला.परंतु मोबाईल बंद येत असल्यामळे पत्नी व लहान मुलगी कुठे आहे, त्याच्यासोबत काही वाईट तर झाले नाही ना असे अनेक विचार पतीच्या मनात फिरत होते. त्यामुळे त्यांनी १५ मे रोजी नरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्या आधारावर पोलिसांनी पत्नी व मुलगी बेपत्ता झाल्याची नोंद घेऊन शोध सुरू केला. तसेच रेल्वे पोलीस व अन्य जिल्ह्याच्या पोलीस ठाण्याला ही माहिती दिली असून अमरावती पोलीससुध्दा महिले सह मुलीच्या शोधात आहेत.–

# भारतीय सैनिकांच्या शौर्याचा सन्मान

## शहरामध्ये उत्साहात भव्य तिरंगा यात्रा

**भारत माता की जय, वंदे मातरम.. घोषणांनी शहर दुमदुमले**





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१९ अमरावती**

जम्मू कश्मीर येथील पहलगाम येथे निर्दोष भारतीय लोकांचे धर्म विचारून त्यांची हत्या पाकिस्तानी दहशतवाद्यांकडून करण्यात आली होती. त्यानंतर ऑपरेशन सिंदूर अंतर्गत भारतीय संरक्षण दलाच्या गौरवपूर्ण कामगिरीच्या सन्मानार्थ आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कणखर नेतृत्वाच्या सन्मानार्थ, त्यांच्या अतुलनीय शौर्याचा सन्मान करण्यासाठी व त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रविवार, १८ मे रोजी अमरावती शहरात भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

भारत मातेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी अमरावती लोकसभेच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी धडाकेबाज शैलीतून देश सेवेसाठी कार्यरत असणाऱ्या आणि पाकिस्तान मध्ये घुसून दहशतवादी अड्डे उध्वस्त करणाऱ्या सैनिकांना धन्यवाद दिले. देशसेवेसाठी आपल्या देशातील सैन्यदलाचे सर्व सैनिक आहोत रात्र डोळ्यांमध्ये तेल घालून आपली रक्षा करतात, त्यामुळे या सैनिकांचा सन्मान झालाच पाहिजे, आणि पाकिस्तानने भारताकडे वाकडे डोळे केले तर त्याचे डोळे काढण्याची हिमत या देशातील सैनिकांची आहे कारण या देशाला लाभलेले नेतृत्व पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी हे आहेत आणि त्यामुळे आज आपला देश जशास तसे उत्तर देतो असे वक्तव्य नवनीत राणा यांनी केले. यावेळी शिवराय कुलकर्णी, दिनेश सूर्यवंशी यांनी सुद्धा आपले मनोगत यावेळी व्यक्त केले.यावेळी विशेष करून या कार्यक्रमाला माजी सैनिकांनी उपस्थिती लावली. यामध्ये ऑल इंडिया एक्स बी एस एफवेल्फेअर असोसिएशन अमरावती तर्फे सर्व माजी सैनिक अध्यक्ष श्रीकांत शेगोकर, मेजर रमेश तराळ, प्रशांत ठाकरे, कवीश्वर माहुरे, प्रवीण चंद्र मसराम, दीपक अवघड, कॅप्टन माधव लुंगारे, मेजर अनिल निर्मळ, बहादूर माजी सैनिक संघटना तर्फे अध्यक्ष बी एस राय, इत्यादी माझी सैनिक सामील झाले, सुभाष चंद्र बोस यांच्या वेशभूषा मध्ये सर्जेराव गलपट होते, माजी खासदार नवनीत राणा व डॉक्टर नितीन धांडे यांनी सर्व माजी सैनिकांचा यावेळी स्वागत सत्कार केला. ही रॅली राजकमल चौक येथून सुरू होऊन सरोज चौक, व तेथून पुढे जयस्तंभ चौक येथे येऊन महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला सौनवनीत राणा, नितीन धांडे, सुनील काळे, सचिनरासने, ललित समदुरकर, एडवोकेट प्रशांत देशपांडे राधा कुरील, कौशिक अग्रवाल, गंगा खारकर, यांनी हार अर्पण करून त्यांना अभिवादन केले. हातामध्ये तिरंगे ध्वज, भारत माता की जय, वंदे मातरम, हिदुस्तान जिदाबाद, पाकिस्तान मुर्दाबाद, अशा घोषणांनी अमरावती शहर दुमदुमले होते. सामूहिक राष्ट्रगीत झाले आणि त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बादल कुळकर्णी यांनी केलेयावेळी प्रामुख्याने माजी खासदार नवनीत राणा, भाजपा ज्येष्ठ नेते प्रा. रवींद्र खांडेकर, किरण पातुरकर, माजी महापौर संजय नरवणे, अमरावती मनपा माजी पक्षनेता सुनील काळे, स्थायी समिती सभापती सचिन रासने, सौ राधा कुरील, युवामोर्चाप्रदेश महामंत्री बादल कुळकर्णी, किसान मोर्चा प्रदेश महामंत्री ललित समदूरकर, युवा मोर्चा शहर अध्यक्ष कौशिक अग्रवाल, महिला मोर्चा अध्यक्ष गंगा ताईखारकर, माजी उपमहापौर कुसुम साहू, स्थायी समिती माजी सभापती विवेक कलोती, माजी नगरसेवक बलदेव बजाज, श्रीचंद तेजवानी, नूतन भुजाडे, पद्मजा कौंडण्य, अजय सारसकर, वंदना मडगे, चंदूबोमरे, राजेशसाहू, माधुरीठाकरे, नीताराऊत, लवीना हर्ष, स्वाती कुलकर्णी, आशिष अतकरे, सुनंदा खरड, वंदनाताई हरणे, इंदुताई सावरकर, गंगाताई अंभोरे, चेतन पवार, सतीश करेसीया, गजानन देशमुख, विनोद गुहे, प्रणित सोनी, मंगेश खोंडे, सुरेंद्र बुरंगे, तसेच भाजपा चे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

### नांदगाव पेठ येथे भव्य तिरंगा रॅली; माजी सैनिकांचा सत्कार, देशभक्तीचा जयघोष

अमरावती ग्रामीण भाजप जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या नेतृत्वात आज सायंकाळी नांदगाव पेठ येथे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत देशभक्तीपर नार्यांनी वातावरण दुमदुमून गेले होते.या प्रसंगी अनेक माजी सैनिकांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. त्यांच्या देशसेवेचे कौतुक करत उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात अभिवादन केले.श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे भारत मातेला वंदन व शहीदांना अभिवादन करून रॅलीची सुरुवात झाली. संपूर्ण गावात तिरंगा रॅलीने भ्रमण करत नागरिकांमध्ये देशभक्तीचे स्फुरण निर्माण केले.कार्यक्रमाला आमदार उमेश यावलकर, आमदार प्रताप अडसळ, आमदार राजेश वानखडे, माजी खासदार नवनीत राणा, माजी भाजप जिल्हाध्यक्ष निवेदिता दिघडे, किरण गुडधे यांच्यासह भाजपचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.रॅलीदरम्यान भारत माता की जय, वंदे मातरम्, जय हिंद अशा घोषणांनी परिसर देशभक्तीच्या भावनेने भरून गेला होता.

# अमरावती – दर्यापूरमार्गावर अवैधरीत्या वाळूची तस्करी !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९वाठोडा शुक्लेश्वर** : – भातकुली तालुक्यातील खोलापूर पोलिस स्टेशन हद्दीतून अमरावती दर्यापूर राज्य मार्गाने मिनी ट्रकच्या साहाय्याने अवैधरीत्या वाळूची तस्करी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. या वाळू तस्करांनी पूर्णा नदीपात्र वाळूमाफियांनी पोखरून टाकले आहेदोन महिन्यांपूर्वी अमरावती दर्यापूर राज्य मार्गावर खोलापूर गावाजवळ अवैधरीत्या वाळूची वाहतूक करणाऱ्या मिनी ट्रकने ट्रॅक्टर ट्रॉली ला मागून जबाबदार धडक दिल्याने या मार्गावर



शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता. मात्र एवढी मोठी घटना घडवूनहीसुद्धा प्रशासनाला जाग आली नाही. या मार्गावर शासन मोठ्या दुर्घटना घडण्याची वाट बघत आहे का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

याच मार्गावर अवैधरीत्या वाळूने भरलेला ट्रक मिनी सुसाट वेगाने सकाळच्या सुमारास वाहतूक करीत आहेत. अवैधरीत्या वाळूचा गोरखधंदा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. आणि प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, महसूलमंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत बावनकुळे त्यांनी घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देणार असल्याचे आश्वासन दिला होते, मात्र या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.नागरिकांना वाढीव दरात वाळू विकत घ्यावे लागते. शासनाने त्वरित घरकुल लाभार्थ्यांना वाळू देण्यात यावी अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# सातुर्णा परिसरात पान टपरीतून गांजा विक्री करणारा अटकेत

## गुन्हेशाखेच्या पथकाची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती–** पान टपरीतून गांजा विक्री करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला गुन्हेशाखेच्या पथकाने शनिवारी रात्री सातुर्णा परिसरातून अटक करून १.८५७किलो गांजा व अन्य साहित्य असा एकूण २९ हजार ८७५ रुपयांचा मुद्देम ाल जप्त केला. विक्की उर्फ सलीम उर्फ विक्रम किशोरसिंह ठाकूर (वय ३५ रा. जुना सातुर्णा) असे अटकेतील युवकाचे नाव आहे.

विक्की हा सराईत गुन्हेगारा असून काही महिन्यापासून त्याने सातुर्णा परिसरात पान टपरी चालवित आहे.परंतु पान टपरीतून तो खुलेआम गांजा विक्री करीत असल्यामुळे पान टपरीवर ग्राहकांची चांगलीच वर्दळ असते. शनिवारी रात्री गुन्हेशाखेचे पथक राजापेठ ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना विक्री ठाकूर पानटपरीतून खुलेआम गांजा विक्री करीत असल्याची माहिती मिळताच पथकाने त्याच्या पानटपरीवर धाड टाकली. पान टपरीची पाहणी केली असता एका पोत्यात १ किलो ८५७ ग्रॅम गांजा व व अन्य साहित्य असा एकूण २९ हजार ८७५ रुपयांचा माल जप्त करून त्याला अटक केली. या कारवाईत गुन्हेशाखेच्या पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर, सपोनि योगेश इंगळे, युसुफ सौदागर, विनय मोहोड, छोटेलाल यादव, अजय मिश्रा, सुधीर गुडधे, विजय बोराडे, संजय भारसाकळे, नईम बेग, आशीष डवले, रंजीत गावंडे, निवृत्ती काकड, चेतन कराडे आणि महिला कर्मचारी वर्षा घोंगडे यांचा समावेश होता.

# मोर्शी शहरात सन २०१९ मधील पुनरावृत्तीची भीती!

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१९मोर्शी** फोटो नाहीशहराच्या मध्यवस्तीतून वाहणाऱ्या दमयंती नदीमध्ये अनावश्यक वनस्पतींची मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. नदीत गाळ साचल्याने पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात घुसून वित्तीय व जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या पावसाळ्यापूर्वी दमयंती नदीचा भाग खोलगट करून स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी माजी नगरसेवक रवी गुल्हाने यांच्यासह नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

सन २०१९ ला मोर्शी शहरात अचानक मुसळधार पाऊस कोसळल्यामुळे मध्य भागातून वाहणाऱ्या दमयंती नदीला महापूर आला. परिणामी, शहरातील खोलवाटपुरा, पेठपुरा भागातील नागरिकांच्या घरात तसेच मेन मार्केटमधील व्यापाऱ्यांच्या दुकानात पाणी घुसून मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली होती. काही घरांची पडझड तसेच धान्य व इतर वस्तूंचे लाखो रुपयांचे नुकसान झाले होते. त्याची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी नगर परिषद प्रशासनाने वेळीच दमयंती नदीतील गाळ व अनावश्यक वनस्पती काढण्याचे काम पावसाळ्यापूर्वी युद्धस्तरावर करावे, अशी मागणी माजी नगरसेवक रवी गुल्हाने यांनी केली.

# संत बेंडोजी बाबा पालखीची १३६ वर्षांची परंपरा

## घुईखेड ते पंढरपूर पायदळ वारीचे २४ मे रोजी प्रस्थान

### ९ जुलैला पंढरपूरला पोहोचणार, ४७ दिवसांचा प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९चांदुर रेल्वे**

आषाढी पौर्णिमा पायदळ वारीचे आयोजन चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील बेंडोजी बाबा संस्थानतर्फे करण्यात आले असुन पंढरीसाठी २४ मे रोजी रवाना होणार आहे. ही दिडी ९ जुलै ला पंढरपूर येथे पोहोचणार असून ४७ दिवसांचा हा प्रवास राहणार आहे. येत्या शनिवारी (ता. २४) घुईखेड मध्ये भव्य कार्यक्रम पार पडणार असून याकरिता अनेक नागरिक घुईखेडमध्ये येणार आहे.श्री परमपूज्य ब्रह्मलीन श्री संत बेंडोजी बाबा संस्थान घुईखेड यांच्या कृपा आशीर्वादाने दरवर्षीप्रमाणे या वर्षीही तीर्थक्षेत्र घुईखेड ते पैठण, आळंदी ते पंढरपूर पदयात्रा दिडी ४७ दिवस–ंचा भव्य दिडी सोहळा २४ मे ते १० जुलै दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. २४ मे रोजी घुईखेड वरून दिडी रवाना होणार असुन ६ जुन रोजी पैठण येथे पोहोचणार आहे. तर ७ जुन रोजी श्री क्षेत्र पैठण येथून दिडीचे प्रस्थान होणार असुन १८ जुन रोजी आळंदी येथे पोहोचणार आहे.यानंतर १९ जुन रोजी आळंदी येथून दिडीचे प्रस्थान होणार असुन ९ जुलै रोजी पंढरपूर येथे पोहोचणार आहे.पंढरपूर काल्यानंतर दिडी परतीच्या प्रवासात आळंदीकडे रवाना होणार आहे. माऊली पालखी सोहळ्यातील ज्ञानेश्वर माऊली रथामागील एकुण २१ मानाच्या दिड्यापैकी मानाची दिडी म्हणून संत बेंडोजी महाराज संस्थान, घुईखेडच्या दिडीचा १७ वा क्रमांक आहे व या रथामागे विदर्भप्रांतातून जाणारी घुईखेड येथील एकमेव दिडी आहे.



**नाव नोंदणी करावी–** घुईखेड ते पंढरपूर पायदळ वारीमध्ये भक्तांना वारी मध्ये भक्तांना सहभागी व्हायचे असल्यास त्यांनी प्रथम आपल्या नावाची नोंद संत बेंडोजी बाबा संस्थान, घुईखेड येथे करावी असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर, विश्वस्त प्रविण घुईखेडकर व इतरांनी केले आहे.

# विदर्भाच्या शाश्वत विकासासाठी विदर्भ एकमेव पर्याय

**तज्ञांनी केले मत व्यक्त**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती –** विदर्भ राज्य आंदोलन आणि राज्यशास्त्र विभाग भारतीय माध्यम , अमरावती आगामी २५ मे २०२५ रोजी , अभियंता भवन अमरावती येथे पहाडी व तासिका तत्वावर कार्यरत शिक्षक अभियंता कर्मचारी आणि सरपंच मेळाव्याच्या पूर्वतयारी दिनांक १८ मे रोजी पार पडलेल्या कार्यक्रमात विविध शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी इच्छुकांनी *विदर्भ शाश्वत विकास एकमेव पर्याय म्हणजे विदर्भ राज्य* सर्व स्तर एकत्रीत प्रयत्न करणे आवश्यक आहे.२५ मे ०२५ रोजी होऊ शकते मेळाव्यात उच्च शिक्षण बेरोजगारी , शेती संकट , नक्षलवाद , आणि कुपोषण अशा अनेक ज्वलंत विषयावर मंथन होणार आहे.प्रथम अध्यक्षस्थानी विदर्भ राज्य महिला प्रदेशाध्यक्ष श्रीमती रंजनाताई मामर्डे , तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रवीण रघुवंशी (अध्यक्ष , नूटा व सचिव , महाराष्ट्र खुला) , प्राचार्य डॉ. सुभाष गवई (अध्यक्ष , तपोवन संस्था , अमरावती) , प्राचार्य डॉ. राजीव सदन अध्यक्ष , प्राचार्य फोरम अवि) नितीन मोहाड अध्यक्ष , ऑटोक्रॉईड आणि प्राचार्य डॉ. पृथ्वीराज सिंह राजपूत (अध्यक्ष , पश्चिम विदर्भ , विदर्भ राज्य आंदोलन) व्यासपीठावर उपस्थित होते. या नेहमीच्या बाबी अधिसभा सदस्य डॉ. प्रशांत विघे यांनी केले होते.या मेळाव्याच्या नागपूर ते अमरावती अशी विदर्भ संकल्पना पदयात्रा दिनांक मे १३ मे पासून विदर्भ चंड माता मंदिर , अनुक्रमिका सुरू २५ मे रोजी मेळाव्याच्या ठिकाणी अमरावती येथे पोचणार आहे.प्रास्ताविकत प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत यांनी



मेळाव्याची सविस्तर रूपरेषा विषय , विदर्भातील वर्तमान समस्या आणि उपाय करताना स्वतंत्र विदर्भाची गरज ठामपणे मांडली. या सदस्य डॉ. प्रवीणवंशी यांनी उच्च शिक्षण रघु विदारक वास्तविक उलगडले. त्यांनी सांगितले की , ३६ , ९४५ अनुदानित शिक्षकांची मंजूरी असली , तरी सध्या फक्त ३०–३५ टक्के शिक्षक कार्यरत आहेत , तत्सम तत्त्वे तत्पर आहेत शिक्षक संपूर्ण शिक्षण चालवतात. शासन पदे नाही , खूप सुशिक्षित बेकार स्त्री आहे. नूटा कोकणच्या लोक आम्ही आंदोलने चालवतोच आता विदर्भ राज्याने सुद्धा चालवतो खाली हे खरेच स्वागत आहे. प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी १९९९ मध्ये झरो झिरोपासून सुरू अभियांत्रिकी तरुणांची न्यायालयीन लढाई आणि आजच्या उच्च शिक्षणावर भाष्य करताना , तरुणांनी या भागांमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. राजीव सदन यांनी २००४ पासून उर्जा उच्च शिक्षण प्रणाली घेतलेली नकारात्मक भूमिका आणि शिक्षण संस्था निर्माण करत आहे संताप व्यक्त केला.ऑटो न्यूयॉर्कचे अध्यक्ष नितीन मोहोड म्हणाले , विदर्भाच्या राज्यासाठी लोक जागरण होणे अत्यावश्यक आहे. विदर्भातील नैसर्गिक व मानव संसाधन शक्ती लोकांना समजणे सांगितल्याशिवाय हे आंदोलन व्यापक होणार नाही. या कार्यक्रमरावती विभागातील शिक्षक , उद्योजक , उद्योजक , तरुण , बेरोजगार , विविध सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. डॉ. प्रशांत विघे यांनी कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचलन केले , तर आभार प्रदर्शन राजेश पिंडदी यांनी आपल्या बहारदार शेरोशायर शैलीत केले.

# शिक्षकांच्या डोक्यावर भर उन्हाळ्यात निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रमाचा भार

## डोईजड झाले शिक्षण विभागाचे ओझे चल रे गड्या कृती कार्यक्रमाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

वर्षभर शैक्षणिक उपक्रम राबविल्यानंतर विद्यार्थ्यां बरोबर शिक्षकांनाही सुट्ट्यांचे वेड लागत असते. वर्षभर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक भार वाहून झाल्यानंतर त्यांनाही सुद्ध्याचा आनंद घ्यायचा असतो. मात्र गत वर्षापासून राजकीय सत्तांतरात शिक्षण विभाग आघाडीवर असल्याचे दिसून येते. वर्षभरापासून अनेक उपक्रमाच्या माध्यमातून शिक्षण विभागाने सातत्य राखले असताना आता मात्र भर उन्हाळ्यात शिक्षकांच्या डोक्यावर निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रमाचा भार दिला. परिणामी 'डोईजड झाले शिक्षण विभागाचे ओझे' असे म्हणत 'चल रे गड्या कृती कार्यक्रमाला' म्हणायची वेळ आली आहे. या माध्यमातून भर उन्हाळ्यात विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या डोक्याला शिक्षण विभागाने ताप दिलेला आहे.



शालेय परीक्षा संपल्यानंतर पालकांचे आपल्या पाल्यां-सह उन्हाळी सुट्ट्यांचे नियोजन असते. त्यामुळे बहुतांश विद्यार्थी बाहेर असतात. अशावेळी उन्हाळी शिबिराचे नाव देऊन निपुण महाराष्ट्र अभियानाच्या कृती कार्यक्रमाला किती विद्यार्थ्यांची शालेय उपस्थिती असेल यावर शंका आहे. जिथे मोठा माणूस भर उन्हात बाहेर पडायला तयार नसतो तिथे निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रमातून विद्यार्थ्याला घराच्या बाहेर पाडायला भाग लावणे ही संतापजनक बाब नाही का, धोकादायक नाही काय? विशेष म्हणजे याच निपुण महाराष्ट्र अभियान कृती कार्यक्रम दरम्यान शासनाने दिलेल्या लिंकवर एकूण २० प्रकारची माहिती शिक्षकांना भरावयाची आहे. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांचे ६ मे २०२५ चे पत्र आणि जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण अधिकारी यांनी पंचायत समिती गटशिक्षण अधिकारी यांना निर्देशित केलेल्या आदेशात म्हटले आहे की, राज्यातील दुसरी ते पाचवीच्या वर्गातील शालेय विद्यार्थ्यांची अध्ययन क्षमता वृद्धिंगत करण्याकरिता निपुण महाराष्ट्र अभियान व त्या अंतर्गत प्रस्तुत कृती कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने शालेय वेळेमध्ये कृती कार्यक्रम सर्व शाळांमध्ये सुरू आहे.या उपक्रमांतर्गत शाळेवेळे व्यतिरिक्त वेळ वापरणे आणि सुट्टीच्या (मे व जून) कालावधीचा सदुपयोग कसा करता येईल त्याकरिता विद्यार्थ्यांना अपेक्षित अध्ययन स्तरावर आणण्यासाठी गाव व शाळा पातळीवर उन्हाळी शिबिर आयोजित करण्याचा मानस आहे. अशा अल्पकालीन शैक्षणिक शिबिराद्वारे विद्यार्थ्यांमधील संभाव्य शैक्षणिक तफावत भरून काढण्यास मदत होईल आणि त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सातत्य राखले जाऊ शकेल. शाळांना उन्हाळी शिबिरांना प्रत्यक्ष भेटी देऊन सह नियंत्रण करावे तसेच केंद्रप्रमुख यांना स्वयंसेवकाची नोंदणी दिलेल्या लिंकमध्ये करणे आवश्यक आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकीसाठी नवी माहिती

## मतदारसंघांची संख्या निश्चित करण्यासाठी लोकसंख्येचा डेटा मागवला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

अमरावती जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी मतदारसंघांची संख्या निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. ग्रामविकास विभागाने पंचायत समितीनिहाय लोकसंख्येची माहिती मागवली आहे. सध्या जिल्हा परिषदेच्या जागा ५९ वरून ६६ पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे.

गेल्या ६ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने राज्यभरातील थांबलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा केला. ओबीसी आरक्षणाबाबतचा अंतीम निर्णय होईस्तोवर न थांबता चार आठवड्यात निवडणूक कार्यक्रम जाहीर करुन चार महिन्याच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका, नगरपालिका व नगरपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रशासकीय तयारी सुरु झाली आहे. या पार्श्वभूमीवर येथील जिल्हा परिषद निवडणूक विभागही



सक्रीय झाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०१७ साली जी आरक्षणाची स्थिती होती, त्या सूत्रानुसार निवडणुका घ्यावयाच्या आहेत. न्यायालयाच्या या निर्देशानुसार आरक्षणाचे सूत्र जरी निश्चित झाले असले तरी निवडणुका नेमक्या किती जागांसाठी घ्याव्यात, हा प्रश्न कायम आहे. सन २०१७ च्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ मार्च २०२२ मध्ये संपुष्टात आला. नियमानुसार त्यापूर्वीच सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार होती. तशी तयारीही राज्य शासन व निवडणूक आयोगाने केली होती.

दरम्यानच्या काळात २०११ च्या जनगणनेऐवजी अद्याप घोषित न करण्यात आलेल्या २०२१ च्या जनगणनेनुसार निवडणूक घेतली जावी, असे राज्य शासनाला वाटले. त्यामुळे २०१७ साली विजयी झालेल्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपुष्टात येण्यापूर्वीच सरासरी वाढ गृहीत धरुन मतदारसंघांची फेररचना करण्यात आली. या फेररचनेत अमरावती जिल्हा परिषदेमध्ये ७ मतदारसंघांची वाढ झाली असून एकूण संख्या ५९ वरुन ६६ वर पोहोचली आहे. त्यामुळे आता घ्याव्या लागणाऱ्या निवडणुका किती जागांसाठी होणार, याबद्दल अनेकांना उत्सुकता आहे.

### लोकसंख्येची माहिती तयार

ग्रामविकास विभागाच्या पत्रानुसार मागविण्यात आलेली लोकसंख्येची माहिती जिल्हा प्रशासनाकडे तयार आहे. राज्य शासन व निवडणूक आयोगाने तीन महिन्यांपूर्वीही हीच माहिती मागविली होती. त्यामुळे नेमका तोच 'डाटा' पुढे करुन ग्रामविकास विभागाकडे माहिती पाठविण्याची प्रशासकीय तयारी शिवाजी शिंदे यांच्या नेतृत्वातील जिल्हा परिषद निवडणूक विभागाने केली आहे. त्याचवेळी या माहितीची एक प्रत राज्य निवडणूक आयोगालादेखील पाठविली जाणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

नेमकी हीच उत्सुकता शमविण्यासाठी शासनाच्या ग्रामविकास विभागाने लोकसंख्येची माहिती मागवली असून त्याआधारे मतदारसंघांची संख्या सांगितली जाणार आहे.

# दर्जेदार व्हिडीओ निर्मिती स्पर्धेतील ४४ विजेत्या शिक्षकांचा सन्मान

## अमरावती पं. समितीचे आयोजन : बक्षिस व प्रमाणपत्राचे मान्यवरांच्या हस्ते वितरण



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

राज्यस्तरीय दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेतील अमरावती पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद व खासगी शाळेतील विविध विजेत्या ४४ शिक्षकांना बक्षिस व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच याप्रसंगी शिष्यवुत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थी व शिक्षक यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन तर, महावाचन उत्सवात प्रथम क्रमांक क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांचादेखील मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिस देऊन सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद माध्यमिक मुलींची शाळा कॅम्प,अमरावती येथील सभागृहात बक्षिस वितरण व सत्कार सोहळ्याचे मंगळवारी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे होते. प्रमुख उपस्थिती उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनोने यांच्यासह विस्तार आधिकरी संदीप बोडखे, अजित पाटील, सुधीर खोडे, गटसमन्वयक अफसर खान व सर्व केंद्र प्रमुख यांची उपस्थीती होती.शालेय शिक्षण विभागाच्या राज्य शैक्षणिक व संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे सन २०२३ ला इयत्ता पहिली ते बारावी व अध्यापक विद्यालय अशा सहा गटात तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर ही स्पर्धा घेण्यात आली होती. त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला. एकूण २८ विषयांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली होती. अमरावती पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद व खासगी शाळेतील शिक्षकांनी या स्पर्धेत मोठया संख्येने सहभाग नोंदविला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मीती स्पर्धेतील सर्व गटातील ४४ विजेत्या शिक्षकांचा प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यानंतर शिष्यवुत्ती परीक्षा २०२४-२५ मध्ये पात्र विद्यार्थी व शिक्षक यांची शाल व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या सत्कार घेण्यात आला. तसेच महावाचन उत्सवमधे ज्या विद्यार्थ्यांनी क्रमांक पटकाविले अशा विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षिस देण्यात आले.यावेळी उपशिक्षणाधिकारी बुद्धभुषण सोनवणे यांनी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तर, गटशिक्षणाधिकारी धनंजय वानखडे यांनी शिक्षक चांगले कार्य करत आहेत. असे कौतुकास्पद वक्तव्य करुन विद्यार्थी व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला सर्व सन्मानित शिक्षक व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.गटसाधन केंद्राच्या विषय तज्ञ अल्का लुंगे, नलीनी गोरे, छाया मिरासे, सारिका काळे, कविता उघडे, वैशाली पाचकवडे, सचिन वानखडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन केंद्र प्रमुख नंदकिशोर झाकर्डे यांनी केले. अल्पोहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

### या शिक्षकांचा झाला सन्मान...

दर्जेदार शैक्षणिक व्हिडीओ निर्मिती स्पर्धेतील विजयी शिक्षकामधील विनायक लकडे, संगीता ठाकरे, असलम अब्दुल रशीद मोहम्मद, कुवरसिंह कासदेकर, अनूप डीके, वीना ठाकरे, तेजश्री निकम, सुनील साबले, रश्मि खाडे, विजया झाडे, विद्या डकरे, सुरभी अडवाणी, स्नेहा गवई, प्रणाली गाड्वे, योगिता डहाणे, सचिन अवघड, राजकन्या कावळे, विजया झाडे, अर्चना धाबे, संगीता बदुकले, मुकेश बिजवे, सरफराज दिदायत खान खान, वंदना मालधुरे, उषा तुंबडे, जयकुमार कांडलकर, सविता रामटेके, सतीश दुबे, तेजल मेहता, प्रमोद घरडे, प्रशांत डोंगरे, पवनकुमार आहूजा, सीमा तिखे, कृष्णा पाल, श्रीकांत लाजुरकर, अतुल ठाकरे, हरीश लड्डा, कविता वऱ्हाडे, सुमती सोनेकर या शिक्षकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

**सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक**
**जाहिरात आणि बातम्यांसाठी**
**संपर्क करा ८६०५९४८८५३**

# श्री गाडगे महाराज आश्रम शाळेच्या माजी विद्यार्थिनीचा अमेरिकेतील यशस्वी प्रवास

## ऐश्वर्या अंकतवार यांना एम.एस. पदवी प्राप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.यवतमाळ**

श्री गाडगे महाराज मिशन, मुंबई संचलित श्री गाडगे महाराज आश्रम शाळा, उमरी (रोड) जि. यवतमाळ येथील माजी विद्यार्थिनी कु. ऐश्वर्या रामकृष्ण अंकतवार हिने अमेरिकेतील प्रतिष्ठीत विद्यापीठातून मास्टर्स इन सायन्स (M.S.) ही पदवी प्राप्त केली असून, ही बाब संपूर्ण संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे.



या उल्लेखनीय यशाबद्दल श्री गाडगे महाराज आश्रमशाळेचे संचालक तथा गाडगे महाराज मिशनचे सचिव श्री. सचिन राजारामबापू घोंगटे तसेच श्री गाडगे महाराज मिशनचे पदाधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी ऐश्वर्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले.ऐश्वर्याने आपल्या कार्यकुशलतेने आणि मेहनतीने मिशनच्या शिक्षण पद्धतीवर एक प्रकारची शिक्कामोर्तब केली आहे. तिचा प्रवास अन्य विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सचिन घोंगटे यांनी सांगितले

शाळेतील माजी शिक्षकांनीही ऐश्वर्याच्या या यशाचा गौरव करताना तिच्या शाळेतील वर्तणुकीचे, अभ्यासातील सातत्याचे व सामाजिक जाणिवेचे कौतुक केले.

# पाच दिवसांनंतरही वैभवला शोधण्यास पोलिसांना अपयश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

काँग्रेसचे नेते हरिभाऊ मोहोड यांचा मुलगा वैभव लग्नाच्या एक दिवसाआधीच घरातून निघून गेला. या घटनेला पाच दिवस पूर्ण झाले परंतु अद्यापही फ्रेजरपुरा पोलिसांना त्याचा पत्ता लागला नाही.



काँग्रेसचे नेते हरिभाऊ मोहोड यांचा मुलगा वैभव मोहोड याचा बुधवारी १४ मे रोजी विवाहसोहळा होता. परंतु लग्नाच्या एक दिवसाआधीच तो घरून ९० हजार रुपये आणि दुचाकी घेऊन निघून गेला. तसेच त्याने त्याच दिवशी राजकमल चौकातून ४० हजार रुपये काढले आणि दुचाकीबडनेरा रेल्वे स्थानकावर ठेऊन तो नागपूरला गेल्याचे पोलीस तपासात समोर आले. त्यानंतर पोलिसांनी आठ वेगवेगळे पथक गठित करून नागपूरला त्याचा शोध घेतला. दरम्यान वैभव नागपूर येथील गणेशपेठ परिसरात असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दिसताच पोलिसांनी पूर्ण गणेशपेठ पिंजून काढले परंतु वैभवचा पत्ता लागला नाही. त्यामुळे वैभव कुठे आहे कोणा सोबत आहे याबाबत पोलीससुध्दा काही सांगू शकत नाही. पाच दिवस झाले तरी वैभवचा शोध न लागल्यामुळे फ्रेजरपुरा पोलिस वैभवला कधी शोधून आणणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

## भाऊ अभिनंदन!....



आमदार रवि राणा यांची आश्वासन समिती चे अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्या बद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर विधानपरिषद सभापती राम शिंदे आणि विधानपरिषद उप सभापती डॉ निलमताई गोऱ्हे यांनी पुष्प गुच्छ देऊन स्वागत करून आणि अभिनंदन केले व यशस्वी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे. उपाअध्यक्ष अण्णा बनसोडे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, विधानसभा सचिव जितेंद्र भोळे, विलास आठवले, सचिव मेघना तळेकर, आदींची यावेळी उपस्थिती होती.

# लोकनेत्या यशोमती ठाकूर यांच्या वाढदिवसाला सेवा, स्वाभिमानाचा संकल्प कार्यकर्त्यांमध्ये उत्साह, अमरावतीसह जिल्ह्यात शुभेच्छांचा वर्षाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

लोकनेत्या तसेच माजी मंत्री ॲड.यशोमतीताई ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध सामाजिक घटकांनी, कार्यकर्त्यांनी सेवा व स्वाभिमानाचा संकल्प करत आपल्या लाडक्या नेत्यावर शुभेच्छा तसेच सद्भावनेचा वर्षाव केला. अमरावती शहरातच नव्हेतर संपूर्ण विदर्भात सुपरिचित गौरक्षण संस्थेमध्ये यशोमतीताईंवर प्रेम करणाऱ्या त्यांच्या चाहत्यांकडून गुळतुला करण्यात आली, तर अमरावती शहरासह तिवसा मतदारसंघात ठिकठिकाणी त्यांना शुभेच्छा देणारे पोस्टर्स व बॅनर्स झळकले. विशेष म्हणजे केवळ राजकीय कार्यकर्तेच नव्हे तर मतदारसंघातील सर्वसामान्य जनता, महिला, युवक तसेच शेतकरीसुध्दा आपल्या कार्यसम्राट नेत्याला शुभेच्छा देण्यासाठी एकत्रित आले होते.



माजी मंत्री, काँग्रेसच्या नेत्या यशोमतीताई ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळपासूनच त्यांच्या निवासस्थानी त्यांचे कार्यकर्ते व चाहत्यांनी एकच गर्दी केली होती. कर्नाटकचे काँग्रेसचे आमदारप्रदीप ईश्वर यांनी त्यांच्या वाढदिवसाला हजेरी लावून कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित केला. कर्नाटकचे आमदार प्रदीप ईश्वर यांच्यासह बालाजी, प्रवीण मनोहर, जयंतराव देशमुख उपस्थित होते. विशेष म्हणजे केवळ काँग्रेसचेच नव्हे तर सर्वपक्षीय चाहत्यांचा गोतावळा असल्याने त्यांनीसुध्दा ताईंना शुभेच्छा देण्यासाठी एकच गर्दी केली होती. शनिवारी सकाळी अंबादेवीच्च्या परिसरातील गौरक्षण संस्थेत यशोमतीताईंची गुळतुला करण्यात आली,यावेळी खा. बळवंत वानखडे, माजी महापौर विलास इंगोले, काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलू शेखावत यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. त्यांच्या निवासस्थानी ताईंना शुभेच्छा देण्यासाठी एकच गर्दी झाली होती. ताईंना शुभेच्छा देणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने खा. बळवंत वानखडे, श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा जि.प. चे माजी अध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप, दिलीपबाबू इंगोले, यांच्यासह अनेक मान्यवरांचा समावेश होता.

# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे चारित्र्य तपासणार

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शालेय शिक्षण विभागाचा मोठा निर्णय कर्मचाऱ्याचा फोटो व माहिती जाणार पोलीस ठाण्यात

**सुधीर केने**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

राज्यातील शाळांमध्ये अलीकडेच वेगवेगळ्या घडलेल्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे याची दखल शालेय शिक्षण विभागाने घेतली आहे . त्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये आता नव्या नियुक्त शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियुक्ती देताना त्यांचा चारित्र्य पडताळणी अहवाल सादर करावा लागणार आहे. एवढेच नव्हे तर नव्या शिक्षकाचा फोटो व त्याची माहिती स्थानिक पोलीस ठाण्यात जमा केली जाणार आहे.गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध माध्यमांच्या शाळांमध्ये अघटित घटना घडल्या आहेत .त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा संकटात आली आहे .यावर तोडगा म्हणून राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपायोजना संदर्भात निर्देश जारी केले आहे. प्रत्येक



शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना त्याची पार्श्वभूमी, पूर्वीची सेवा, त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी याची पडताळणी करण्यात येणार आहे. त्या कर्मचाऱ्याला नेमणुकीपूर्वी चारित्र्य पडताळणी अहवाल पोलीस यंत्रणेमार्फत प्राप्त करून घेणे अनिवार्य झाले आहे. एवढेच नव्हे तर सदर कर्मचाऱ्याच्या नेमणुकीनंतर संबंधित व्यक्तीच्या छायाचित्रासह त्याची सर्व तपशीलवार माहिती स्थानिक पोलीस यंत्रणे कडे द्यावी लागणार आहे .कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणीकरिता क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टिम सारख्या तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजनांचा वापर करण्याचा यावा असे निर्देशही देण्यात आले आहे. नेमणुकीनंतर एखाद्या कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी ही फौजदारी गुन्ह्याशी संबंधित असल्याचे निदर्शनास आल्या त्या तात्काळ सेवेतून कमी करण्यात यावे असेही निर्देश देण्यात आले आहे.शाळेतील वाहतूक सुरक्षा गृह व्यवस्थापन तसेच उपाहारगृह यासाठी नेमण्यात येणारा कर्मचारी वर्ग मान्यता प्राप्त संस्थेकडून नेमण्यात येणार आहे. सदर कर्मचाऱ्यांची पोलीस यंत्रणे कडून चारित्र्य पडताळणी करून प्रमाणपत्र घेण्यात यावे असे स्पष्ट निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत .विशेष म्हणजे हा नियम नियमित, बाह्य स्त्रोतांद्वारे अथवा कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांना लागू राहणार आहे.मुलांवरील हिंसाचार किंवा गैरवर्तनाचा समावेश असलेल्या कोणत्याही घटनेबाबत वेळेवर दखल घेण्यासाठी मुलांशी संबंधित शासकीय आणि बिगर शासकीय संस्थांच्या प्रमुखांवर ही जबाबदारी टाकण्यात आली आहे .या प्रमुखांनी पर्यवेक्षक म्हणून काम करावे असे निर्देश देण्यात आले आहेत. सध्या शाळांमध्ये बायस्त्रोताद्वारे अथवा कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करून घेतलेली नसल्यास अशी पडताळणी तात्काळ करून घेण्यात यावी याची सर्वस्वी जबाबदारी शाळा व्यवस्थापनावर टाकण्यात आली आहे.

प्राथमिक साठी महिला कर्मचारीच!शाळांमध्ये बायस्त्रोताद्वारे अथवा कंत्राटी पद्धतीने शिक्षकेतर कर्मचारी नियुक्त करताना पूर्व प्राथमिक तसेच इयत्ता पहिली ते सहावी या वर्गासाठी शक्यतो महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश शालेय शिक्षण विभागाने दिले आहे.

# बच्चू कडू यांनी केली सरकारच्या आदेशाची होळी...





अमरावतीच्या गुरुकुंज मोझरी येथे शिक्षकांच्या मागणीसाठी बच्चू कडू यांनी आज आंदोलन केले. जिल्हा परिषद शाळांना जाचक ठरणारा जीआर रद्द करा करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. राज्य शासनाने १५ मार्च २०२४ रोजी शालेय शिक्षणासंबंधी काढलेला संच मान्यतेचा शासन निर्णय हा जि.प. शाळांचा घात करून ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था मोडकळीस आणणारा आहे. त्यामुळे सरकारने यावर आपली भूमिका स्पष्ट करत हा जीआर तत्काळ रद्द करावा अशी मागणी बच्चू कडू यांनी केली. सरकारने काढलेला हा जीआर बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ ला छेद देणारा असल्याचा आरोप ही केला .

# बहावा बहरला पाऊस वेळेवर येणार! निसर्गातील बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

निसर्गातील प्रत्येक झाडांना फुले, फळे येण्याचा एक विशिष्ट काळ आहे. काही झाडे, वेली, वनस्पतींचे काही गुणधर्म आहेत. त्यांच्या बहरण्यावरून पावसाचा अंदाज काढता येतो. यावर्षी बहावा या वनस्पतीला सर्वत्रच मोठ्या प्रमाणात बहर आला आहे. यावरून यंदाचा पाऊस वेळेवर अन् चांगला होईल, असे संकेत जाणकारांकडून व्यक्त केले जात आहेत.



पाऊस कधी येणार, येणार तर किती प्रमाणात येणार, हे सांगणारी यंत्रणा, हवामानशास्त्र विभाग प्रगत आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, आदिवासी बांधव हे अनेक गोष्टींवरून पाऊस लवकर येणार की उशिरा येणार, याचा अंदाज घेतअसतात. निसर्गच पावसाच्या आगमनाची चाहूल देतो. अनेक वनस्पती या नैसर्गिक बदलाचे संकेत, संदेश देतात. बहावा ही आकर्षक गर्द पिवळ्या रंगाची फुले येणारी वनस्पती आहे. बहावा फुलण्य वा एप्रिल ते मे महिना हा काळ आहे. विशेषतः बहावा हा प्रखर उन्हात अधिक चांगला बहरतो. उन्हाची तीव्रता जेवढी जास्त तेवढे बाष्पीभवन अधिक होते. साहजिकच पावसाचे प्रमाण चांगले असते. पूर्वजांनी बहावा व पावसाचा संबंध जोडला असावा.

### पक्षीही देतात संकेत

झाडांशिवाय अनेक पक्षीही पावसाचे संकेत देत असतात. काही पक्षी त्यांची घरटी झाडाच्या वरच्या टोकाला साकारत असतील, तर यावरून निश्चितपणे पाऊस भरपूर येण्याचा अंदाज काढला जातो. काही पक्षी हे झाडाच्या पूर्व भागात घरटे बांधत असेल, तर त्यावर्षी अधिक पाऊस होण्याचे संकेत मिळत असतात.

# शेतकऱ्यांना होती पीककर्ज माफीची आस; त्यात पुन्हा सावकारीचा फास!

## बँकांची वसुली मंदावली, यंदा पीककर्जाच्या नूतनीकरणावर परिणाम होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

सध्या पीककर्जासाठी शेतकऱ्यांकडून अर्ज सादर करण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. जिल्ह्यातील किती शेतकरी खरीप हंगामातील पीककर्जाची उचल करणार, ही बाब जून महिन्याच्या अखेरपर्यंत स्पष्ट होणार आहे. परंतु, सत्ताधाऱ्यांनी विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार कर्जमाफी होईल, ही आशा असलेल्या शेतकऱ्यांचा भ्रमनिरास झाला. त्याचा परिणाम यंदा पीककर्जाच्या नूतनीकरणावर होण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात खरीप हंगामात शेतकऱ्यांना विविध बँकांमार्फत पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी शासनाची योजना आहे. मात्र, पीककर्जही वेळेत दिले जात नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होते. शेतात पेरणी केल्यानंतर कधी पाऊस दगा देतो, तर कधी अतिवृष्टीचा तडाखा बसतो. अनेकदा नुकसानीचा सामना करावा लागतो. अशावेळी



पीककर्जही थकीत पडते. थकीत शेतकऱ्यांना पीककर्ज मिळण्यात अडचणी येऊन सावकारांच्या दार त्यांना ठोठावे लागते.जिल्ह्यात खरीप हंगामासाठी पीककर्ज हवे असलेल्या शेतकऱ्यांकडून अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. जे शेतकरी नियमित कर्ज उचल करतात ते शेतकरी बँकांमध्ये जाऊन नूतनीकरण करीत आहेत. काही दिवसांतच शेतकऱ्यांना कर्ज वितरण केले जाणार आहे.

**यंदा शेतकऱ्यांना कर्जमाफीची होती अपेक्षा**

गतवर्षी बँकांना दिलेले पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट बँकांनी पूर्ण केले नाही. यावर्षीतरी कर्जवाटपाची टक्केवारी वाढावी यासाठी बँकांना निर्देश देण्यात आलेले आहेत. विशेष म्हणजे, अनेक शेतकऱ्यांना पीककर्ज मिळविताना अडथळ्यांशी शर्यत करावी लागते. त्यामुळे शेतकरी संकटात सापडतात.

# अकरावीची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया आजपासून सुरु , विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

दहावीचा निकाल ऑनलाइन नुकताचजाहीर झाला. जिल्ह्यात यंदा वर्ग दहावीत १३,३४७ विद्यार्थी पास झाले. सुमारे ७० टक्के विद्यार्थ्यांचा कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश होण्याची शक्यता आहे. यंदा माहे जून २०२५ पासून इयत्ता ११ वी कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रवेशाची व्याप्ती राज्यस्तरीय वाढविण्याच्या दृष्टीने इयत्ता ११ वीचे सर्व प्रवेश ऑनलाइन करण्यात आले आहेत.आज सोमवार पासुन विद्यार्थ्यांना ऑनलाइन रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.रजिस्ट्रेशन नसल्यास कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश मिळणार नसल्याची माहिती माध्यमिक शिक्षण विभागाने दिली आहे. प्रवेशासंदर्भात कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक शाळांची माहिती घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती माध्यमिक शिक्षण विभागाने दिली आहे. अकरावी प्रवेशप्रक्रियेसंदर्भात पुणे विभागाच्या सहायक शिक्षण उपसंचालकांनी जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांची व्हीसी घेऊन माहिती दिली आहे, पालकांनी प्रवेशासाठी आवश्यक आहे. पालकांनी प्रवेशासाठी आवश्यक ते सर्व दाखले सेतू कार्यालयातून तत्काळ काढून घ्यावेत.ऑनलाइन प्रवेशासंदर्भात पालकांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी ही सोय करण्यात येणार असल्याची माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयाने दिली आहे.

### कागदपत्रे व वेळीच शुल्क भरणे आवश्यक

विद्यार्थ्यांनी संबंधित बोर्डाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करावी. नोंदणीनंतर प्रवेश अर्ज भरावा. आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. शुल्क भरणे आवश्यक आहे. काही अभ्यासक्रमांमध्ये निवड चाचणी, प्रवेश परीक्षा राहील. त्यासाठी विद्यार्थ्यांना उपस्थित राहावे लागेल. त्यानंतर विद्यार्थ्यांना निवडीची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### सर्व विद्यार्थ्यांना मिळणार प्रवेश

महाविद्यालयांना नोंदणी करण्यासाठी सांगितले आहे. यंदा ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविली जाणार आहेत. त्यासंदर्भातील सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. यंदाची अकरावी प्रवेशप्रक्रिया अत्यंत पारदर्शक होणार असून, कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, याची काळजी शिक्षण विभाग घेणार आहे, अशी माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

### १९ ते २८ मे पर्यंत रजिस्ट्रेशन सुरू राहील

दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी १९ ते २८ मे २०२५ या कालावधीत रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक केले आहे. यासंदर्भातील वेबसाइट लवकरच शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात येणार आहे. याच काळात विद्यार्थ्यांनी पसंतीचे महाविद्यालय निवडावे, असेही कळविण्यात आले आहे.

# दर्यापूरचे सराफा दुकान फोडणारी आंतरराज्यीय टोळी अटकेत : स्थानिक गुन्हे शाखेचा यशस्वी उलगडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

दर्यापूर येथील सराफा दुकान फोडून सुमारे ७७.६९ लाख रुपयांची सोने, चांदी व रोकड लंपास करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला. चारही आरोपींनी त्या गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून १५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अमरावती ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने शनिवारी अटक केलेल्या या टोळीने बीड, खामगाव व मध्यप्रदेशातील नेपानगर येथील घरफोडीच्या घटनांची देखील कबुली दिली. आरोपींनी ९ मे रोजी दर्यापूर येथील सराफा दुकान लुटले होते.

अटक आरोपींमध्ये सुरेश अशोक मोरे (३०, रा. लालबाग, जालना), विजय कैलास खरे (३०, रा. कन्हय्या नगर,



जालना), भोलू भीमराव निकाळजे (३०, रा. राजीवगांधी नगर, लालबाग, जालना) व क्रिष्णा हरिचंद्र गायकवाड (३१, रा. खरपोडी, जालना) अशी अटक आरोपींची नावे आहेत. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले पाच लाख रुपये किमतीची चारचाकी, ३८.२४० ग्रॅम सोने, पाच किलो चांदी, दोन मोबाईल असा एकुण १४ लाख ४७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चारही आरोपींना दर्यापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

दर्यापुरातील बनोसा येथील रमेश लोणकर यांचे तेथीलच जिनिंग मार्केट येथे विक्रम ज्वेलर्स नावाचे सराफा दुकान आहे. ९ मे रोजी सकाळी तेथे चोरीचा प्रकार उघड झाला होता. चोरांनी तेथून ७६० ग्रॅम सोन्याचे दागिने, १२.८०० किलो चांदीचे दागिने व रोख ५.५० लाख रुपये असा एकूण ७७ लाख ६९ हजार रुपयांचा माल चोरून नेला होता. दर्यापूर पोलिसांनी १० मे रोजी गुन्हा दाखल केला होता. प्रभारी पोलीस अधिक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या टीम एलसीबीने अवघ्या काही दिवसांत यशस्वी उलगडा केला.

# जिवंत सातबारा महसूल विभागाचा आगळा - वेगळा विक्रम : शेतकऱ्यांना मिळतो आहे दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

महसूल विभागाच्या 'जिवंत सातबारा' मोहिमेमुळे शेतकऱ्यांसाठी जमिनीच्या मालकी हक्कांच्या नोंदी सुलभ करण्याचा मार्ग मोकळा झाल्याने, आतापर्यंत राज्यातील पाच लाखांहून अधिक सातबारा उताऱ्यांवर वारसांच्या नोंदी पूर्ण झाल्या आहेत . विशेष म्हणजे, वारस नोंदी अद्ययावत करण्याचा महसूल विभागातील हा आजवरचा विक्रम मानला जात आहे.महाराष्ट्रात 'जिवंत सातबारा' मोहीम सुरू करण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला. याआधी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यात प्रायोगिक तत्त्वावर हा कार्यक्रम राबवण्यात आला होता. त्यानंतर तो राज्यभरात राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.जिवंत सातबारा म्हणजे जी व्यक्ती मयत झाली आहे, पण अद्यापही सातबारा उताऱ्यावर त्यांची नावे आहेत, ती काढून शेतजमिनीच्या सातबारा उताऱ्यावर मयत व्यक्तींच्या वारसांच्या नावांची नोंद लावण्यात येत आहेत. यामुळे जमीन खरेदी-विक्री, कर्ज सुविधा, अनुदान मिळवताना वारसांना येणाऱ्या अडचणी संपतील, असे सांगितले जात आहे.सुमारे २२ लाख उतारे अद्ययावत करण्याचे उद्दिष्ट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी निश्चित केले आहे. अनावश्यक आणि कालबाह्य नोंदी हटवण्याचे काम सध्या सुरू आहे. महसूल विभागाने या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला, महाराष्ट्र दिनापासून (१ मे २०२५) सुरुवात केली आहे.



या मोहिमेत मृत खातेदारांची नावे काढून कायदेशीर वारसांची नोंद केली जात आहे. राज्यातील ४५ हजार गावांमध्ये प्रत्येक गावात किमान ५० उताऱ्यांवर नोंदी होणार आहेत. ई-फेरफार प्रणालीद्वारे तलाठी आणि मंडळ अधिकारी हे काम करत आहेत. यासोबतच 'अपाक शेरा', 'एकुम नोंद', 'तगाई कर्ज', 'भूसुधार कर्ज', 'पोकळीस्त' यासारख्या कालबाह्य नोंदी हटवल्या जात आहेत. भूसंपादन निवाडा, बिनशेती आदेश, पोटखराब क्षेत्राचे रूपांतर, स्मशानभूमी नोंदीही अद्ययावत होत आहेत.

बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात यशस्वी प्रयोगांनंतर ही मोहीम राज्यभर राबवली जात आहे. शेतकऱ्यांना मृत्यू प्रमाणपत्र, आधार कार्ड, वारस प्रमाणपत्र सादर करावे लागतील. अद्ययावत उतारे भूलेख पोर्टलवरून डाउनलोड करता येतील. डिजिटल तंत्रज्ञानामुळे ही प्रक्रिया सुलभ झाली आहे. शेतकऱ्यांना त्यामुळे दिलासा मिळाला आहे.

